


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

* वर्ष ६५ वे * अंक ५४ * नांदेड * गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211




# राज्यसभा उमेदवारीसाठी सर्वच पक्षांत चुरस

## भाजपकडून विनोद तावडे, आठवले ?

**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्यसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महायुतीकडूनही जोरदार तयारी सुरू आहे. तर भाजप आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडूनही उमेदवारांची नावे निश्चित करण्यात आली आहेत.

महाविकास आघाडी आणि महायुतीच्या काही दिग्गज नेत्यांचा राज्यसभेतील कार्यकाळ संपत असल्यामुळे पक्षीय नेत्यांकडून स्थानिक व केंद्रस्तरीय राजकीय रणनीतीत गती वाढली आहे भाजपकडून विनोद तावडे, रामदास आठवले यांच्यासह विजया रहाटकर आणि धैर्यशील पाटील यांची नावे चर्चेत आहेत, तर शिंदेंच्या शिवसेनेकडून राहुल शेवाळे, शायना एनसी आणि संजय निरुपम यांच्यावर विचार सुरू आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून पार्थ पवार यांची राज्यसभेवर वर्णी लागणार असून, सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती मिळाली आहे.

महाराष्ट्रातील ७ खासदारांचा कार्यकाळ संपत असल्याने शरद पवार, डॉ. भागवत कराड, फौजिया खान, प्रियंका चतुर्वेदी, धैर्यशील पाटील, रजनी पाटील आणि रामदास आठवले यांच्या जागांसाठी गटस्तरीय निर्णय घेण्यात येत आहेत. भाजपच्या उमेदवारांची अंतिम यादी फायनल झाल्यानंतर केंद्राकडून अंतिम मान्यता मिळेल, असे गिरीश महाजन यांनी स्पष्ट केले.

सध्याच्या विधानसभेतील संख्यात्मक परिस्थिती पाहता, भाजपकडे १३१ आणि १ अपक्ष आमदार असून, एका खासदारासाठी ३७ मतांची आवश्यकता असल्यामुळे भाजपकडून ३ ते ४ खासदार राज्यसभेत निवडून येऊ शकतात. तर शिंदेंच्या शिवसेनेकडे ५८ आमदार असून, त्यांचा एकच खासदार राज्यसभेत निवडून येऊ शकतो महायुतीकडे संख्याबळ जास्त असल्यामुळे त्यांचे खासदार जास्त प्रमाणात राज्यसभेत निवडून जाण्याची शक्यता आहे. राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे की, महायुतीच्या झोळीतून लढल्यास भाजपचे ३. शिंदे शिवसेनेचा १ आणि राष्ट्रवादीचा १ खासदार राज्यसभेत पोहचू शकतात. ज्यामुळे आगामी निवडणुकीत महाराष्ट्राचे राजकीय समीकरण बदलू शकते.

### महाविकास आघाडीकडे राज्यसभेची एकच जागा; शरद पवार की शिवसेना?

विधानसभेतील संख्याबळ पाहता महाविकास आघाडीला एक जागा सहज जिंकता येऊ शकते. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे २० आमदार, काँग्रेसचे १६ आमदार आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे १० आमदार असं एकूण गणित आघाडीच्या बाजूने आहे.

काही अपक्षांचाही पाठिंबा असल्यामुळे ही जागा सुरक्षित मानली जाते, पण उमेदवार कोण? यावरच राजकीय तोलामोलाची लढाई सुरू आहे. राज्यसभेची निवडणूक तोंडावर आली आहे आणि महाराष्ट्राच्या वाट्याला आलेल्या सात जागांपैकी सहा जागा महायुतीच्या खात्यात जाणं जवळपास निश्चित मानलं जात आहे. पण खरी राजकीय उत्सुकता आहे त्या एका जागेबाबत. जी महाविकास आघाडीच्या वाट्याला येते. ही एकमेव जागा कोणाला द्यायची? शिवसेना की राष्ट्रवादी? की काँग्रेस? यावरून आघाडीत जोरदार चर्चा सुरु आहे. विधानसभेतील संख्याबळ पाहता महाविकास आघाडीला एक जागा सहज जिंकता येऊ शकते. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे २० आमदार, काँग्रेसचे १६ आमदार आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे १० आमदार असे एकूण गणित आघाडीच्या बाजूने आहे.

### भिगवण प्रकरणात मोठा ट्विस्ट; पाच दिवसांत तरुणीने बदलला निर्णय

**पुणे (प्रतिनिधी)** – महाष्ट्राभर चर्चा असलेल्या भिगवण प्रकरणात अनेक दावे, प्रतिदावे समोर येत होते, पण आता स्वतः मुलीनेच केलेल्या एका दाव्यामुळे संपूर्ण प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

पुणे जिल्ह्यातल्या भिगवणमध्ये एका तरुणीचे अपहरण केल्याचा दावा केला जात होता, विशेष म्हणजे या मुलीचं लग्न दोन दिवसांवर असताना तिचं अपहरण झाल्याची माहिती समोर आली होती. लग्नाची खरेदी करून ही तरुणी आपल्या आई आणि भावासोबत घरी जात असताना तिचं अपहरण करण्यात आलं. यावेळी तिच्या आईच्या आणि भावाच्या डोळ्यात मिरची पूड देखील टाकण्यात आली, असा दावा करण्यात येत होता. या प्रकरणी हिंदुत्ववादी संघटनांनी आक्रमक भूमिका घेत न्यायालयीन चौकशीची मागणी केली. नंतर या मुलीचा एक व्हीडीओ समोर आला. ज्या व्हीडीओमध्ये बोलताना या मुलीनं मोठा दावा केला होता. मी संबंधित मुलासोबत माझ्या मर्जीने पळून आले, आमचे प्रेमसंबंध आहेत, असं या मुलीने व्हीडीओमध्ये म्हटलं होतं.

आज खा. अशोकराव चव्हाणांच्या प्रमुख उपस्थितीत

# महापौर कविता मुळे १०० दिवसांचा विकास आराखडा जाहीर करणार

**नांदेड (प्रतिनिधी)** –महापालिका निवडणुकीवेळी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी खा. अशोक चव्हाण यांनी यंत्रणा सज्ज केली आहे. नांदेडकरांना दिलेल्या शब्दानुसार खा. चव्हाण यांच्या उपस्थितीत महापौर कविता संतोष मुळे गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी १०० दिवसांचा विकास आराखडा जाहीर करणार आहेत.

महानगरपालिका निवडणुकीचा रणसंग्राम सुरू असताना खा. अशोक चव्हाण यांनी नांदेड शहरात विविध प्रभागांत प्रचार करीत असताना भारतीय जनता पार्टीची सत्ता महापालिकेमध्ये आल्यास प्रगतिशील नांदेडचा आणखी जास्त विकास करू, असे आश्वासन दिले होते. यावेळी त्यांनी मीच नगरसेवक आहे असे समजून भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना निवडून आणण्याचे नांदेडकरांना आवाहन केले होते. जगामध्ये जे-जे चांगले ते-ते नांदेड येथे आणण्याचे अभिवचन त्यांनी या प्रचार सभांमध्ये दिले होते. यावेळी त्यांनी मध्यप्रदेशातील इंदौरसारखे स्वच्छ शहर करणार असे सांगत जाहीरनामा प्रकाशित केला होता. त्यात शहरात पायाभूत सुविधा निर्माण करणे, एअर कनेक्ट, रोड कनेक्ट करणे, मुंबई बेंगलोरला लाजवेल असे रस्ते व संकुले तयार करणे, मोठमोठे मॉल नांदेडमध्ये उभारणे, शहरातील वाहतूक कोंडी सोडवणे, इलेक्ट्रिक बसेस सुरू करणे, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची निर्मिती करणे, भूमिगत वायरिंग करणे, गोदावरी प्रदूषण मुक्त प्रकल्प राबविणे, आपत्ती निवारणाचे विभागीय केंद्र नांदेड येथे स्थापन करणे तसेच कॉपीमुक्त नांदेड मोहीम राबविणे आदी विकास कामांचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले होते.

खा. चव्हाण यांच्या या शब्दाला कौल देत नांदेडवासियांनी भाजपला महापालिकेची सत्ता दिली. यामुळे आता दिलेल्या आश्वासनाची पूर्ती करण्याकरिता शहराच्या विकासासाठी यंत्रणा सज्ज केली आहे. गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी खा. अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत महापालिकेच्या महापौर कविता मुळे ह्या १०० दिवसांचा आराखडा जाहीर करणार आहेत. हा कार्यक्रम शहरातील एका हॉटेलमधील सभागृहात होणार असल्याचे महापौर प्रतिनिधी संतोष मुळे यांनी सांगितले.

# रोहित पवार, अमोल मिटकरींची पोलिसांसोबत बाचाबाची

## विमान कंपनीवर गुन्हा दाखल करण्यासाठी आक्रमक

**मुंबई (प्रतिनिधी)**– मुंबईतील मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात आमदार रोहित पवार आणि आमदार अमोल मिटकरी हे आक्रमक झाले आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं अपघाती निधन झालं, याबाबत पुरावे असताना पोलीस कारवाई का करत नाहीत, असा सवाल त्यांनी पोलीस ठाण्यात जाऊन उपस्थित केला. यावेळी पोलीस ठाण्यामध्ये बाचाबाची झाल्याचे व्हीडीओ देखील समोर आले आहेत. पोलीस ठाण्यामध्ये रोहित पवार आणि अमोल मिटकरी आक्रमक झाल्याचे दिसून आले. इतके पुरावे आहेत. सगळे न्यूजमध्ये सगळं आलेलं आहे, कारवाई का केली जात नाही, पोलीस ठाण्यामध्ये हे नेते आक्रमक झाल्याचे दिसून आले.

मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यामध्ये रोहित पवार, अमोल मिटकरी आणि संदीप क्षीरसागर आक्रमक झालेले आहेत. डीजीसीए आणि व्हीएसआर कंपनी यांच्या विरोधात तात्काळ तक्रार दिल्यानंतर गुन्हा दाखल करावा ही प्रमुख मागणी या नेत्यांची आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं अपघाती निधन झालं आहे. त्यामुळे फक्त कारवाई करू अशी आश्वासन नको आहेत. तात्काळ कारवाई करून गुन्हा दाखल करावाश अशी मागणी देखील या नेत्यांनी केली आहे.

# मुलांच्या ऑनलाईन गेमबाबत तज्ज्ञ टास्क फोर्स स्थापन

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यात वाढत चाललेल्या मुलांच्या डिजिटल व्यसनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने तज्ज्ञांची टास्क फोर्स स्थापन केली असून, पुढील अधिवेशनाच्या आत सविस्तर अहवाल सादर केला जाईल, अशी माहिती राज्याचे माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी विधान परिषदेत दिली. विधान परिषद सदस्य निरंजन डावखरे आणि संजय केणेकर यांनी लक्षवेधीद्वारे हा विषय उपस्थित केला होता. चर्चेत प्रवीण दरेकर, चित्रा वाघ, भाई जगताप आणि उमा खापरे यांनी सहभाग घेतला.

राज्यात १८ वर्षांखालील सुमारे चार कोटी मुले असून, त्यापैकी जवळपास तीन कोटी मुले ही १५ वर्षांखालील आहेत. त्यामुळे डिजिटल व्यसन हा केवळ वैयक्तिक नव्हे तर सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न बनला आहे. गेमिंग ॲप्स, सोशल मीडिया वापरावर वयोमर्यादा, अल्पवयीनांसाठी जाहिरातींवर निर्बंध यांसारख्या उपाययोजनांबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले.

राज्य सरकारकडून २ फेब्रुवारी रोजी प्रधान सचिव विरेंद्र सिंह यांना लेखी आदेश देऊन तज्ज्ञ कार्यदल स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले. या टास्क फोर्समध्ये शिक्षणतज्ज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ, तंत्रज्ञान तज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ, डॉक्टर तसेच संबंधित विभागांचे अधिकारी असतील.

# सातारा गॅझेट लागू करा अन्यथा जूनमध्ये उपोषणाला बसणार -जरांगे

**मुंबई (प्रतिनिधी)** – कुणबी प्रमाणपत्रासाठी आलेल्या प्रत्येक अर्जदाराला प्रमाणपत्र द्या, याच अधिवेशनात सातारा गॅझेट लागू करा अन्यथा जूनमध्ये उपोषणाला बसणार असल्याचा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगेंनी दिला. मराठा समाजामुळेच हे सरकार सत्तेवर आले आहे. सरकारने न्याय नाही दिला तर २०२९ मध्ये हाच समाज भाजपाला पायउतार करेल असा इशारा जरांगे पाटलांनी परभणीत दिला.

परभणीत शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी बाधित शेतकरी उपोषणाला बसलेले आहेत. आज याच शेतकऱ्यांना मनोज जरांगे पाटील यांनी भेट दिली आणि आणि शेतकऱ्यांशी चर्चा केली. आपलं म्हणणं सरकार दरबारी मांडलं पाहिजे असेही मनोज जरांगे म्हणाले.

## अजितदादांची बारामती सुनेत्रा पवारच सांभाळणार


**बारामती** – राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीची तयारी निवडणूक आयोगाने सुरू केली आहे. या विधानसभा मतदारसंघासाठी विशेष संक्षिप्त मतदारयादी पुनरीक्षण कार्यक्रम आयोगाने जाहीर केला असून १ जानेवारी २०२६ पर्यंत नाव नोंदविलेले मतदार पोटनिवडणुकीत मतदान करू शकणार आहेत. या मतदारसंघासाठी १० मार्चला अंतिम मतदारयादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तर बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीचा उमेदवार ठरला असल्याची माहिती समोर आली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार बारामती पोटनिवडणूक लढणार असल्याची माहिती आहे. राष्ट्रवादी काँग्रेस

(पान ३ वर...)

## न्यूझीलंडचा ६१ धावांनी दणदणीत विजय

**कोलंबो** – टी २० वर्ल्ड कपचं आयोजन करणाऱ्या श्रीलंकेचा प्रवास अखेर संपला आहे. न्यूझीलंड विरुद्ध सुपर ८ मध्ये पराभव झाल्यानं श्रीलंकेचं आव्हान संपलं आहे. श्रीलंकेचा सुपर ८ मधील हा दुसरा पराभव ठरला. न्यूझीलंडनं प्रथम फलंदाजी करताना ७ बाद १६८ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करण्यात श्रीलंकेला अपयश आलं. श्रीलंका २० ओव्हरमध्ये ८ बाद १०७ धावा करू शकली. यामुळं न्यूझीलंडनं श्रीलंकेला ६७ धावांनी पराभूत केलं.

श्रीलंकेचा कर्णधार दसून शनाका यानं टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. तो निर्णय श्रीलंकेला महागात पडल्याचं पाहायला मिळालं. न्यूझीलंडची ८४ धावांवर ६ विकेट अशी बिकट स्थिती झाली होती. मात्र त्यानंतर न्यूझीलंडचा कॅप्टन मिशेल सँटनर आणि कोल मॅककॉन्ची या दोघांनी केलेल्या भागीदारीमुळं त्यांनी २० ओव्हरमध्ये ७ बाद १६८ केल्या.















जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील


# पेन्शन कशासाठी ?

लोकप्रतिनिधींना मानधन, भत्ते किंवा काही स्वरूपाची सामाजिक सुरक्षितता देणे तत्त्वतः चुकीचे नाही. पूर्णवेळ सार्वजनिक आयुष्य जगणाऱ्यांना निवृत्तीनंतर किमान आर्थिक स्थैर्य असावे, हा युक्तिवाद ग्राह्य आहे. परंतु प्रश्न 'पेन्शन असावे की नसावे' इतकाच मर्यादित नाही. प्रश्न आहे की ते किती असावे, कोणत्या अटींवर असावे आणि ती सर्वसामान्य नागरिकांप्रमाणेच समान नियमांच्या चौकटीत का नसावे? सामान्य कर्मचारी आयुष्यभर कष्ट करून, निवृत्तीवेतन निधीत नियमित भर घालून, काटकसरीने संसार चालवतो. असंघटित क्षेत्रातील कामगार, शेतकरी, लघुउद्योगातील कामगार यांना तर निवृत्तीवेतन ही अजूनही दूरची गोष्ट वाटते. त्यांच्यासाठी सामाजिक सुरक्षिततेची हमी अपुरी, विस्कळीत किंवा योजनांवर अवलंबून असते. अशा वेळी लोकप्रतिनिधींना केवळ एका कार्यकाळानंतर आयुष्यभर पेन्शन मिळणे, तेही कोणत्याही योगदानाशिवाय, ही बाब लोकशाहीतील समतेच्या तत्त्वाला बाधा आणणारी नाही का, हा प्रश्न उपस्थित होतो. हे एवढ्यावरच न थांबता त्या लोकप्रतिनिधींच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबाला देखील ती पेन्शन मरेपर्यंत मिळत राहते. याचा विचार श्रीलंकेच्या सुज्ञ लोकशाहीने केला आहे. नुकतेच श्रीलंकाने खासदारांची पेन्शन रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय या पार्श्वभूमीवर विशेष ठरतो. जनतेला कारभार सहन करण्याचे, अनुदाने कमी करण्याचे आणि सार्वजनिक खर्चावर मर्यादा आणण्याचे आवाहन करताना सत्ताधाऱ्यांनी स्वतःच्या विशेषाधिकारांवरही गदा आणली, हे लोकशाहीच्या आरशात पाहण्यासारखे आहे. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या आणि आर्थिक विषमता असलेल्या देशात हा प्रश्न अधिक तीव्र आहे. येथे आमदार, खासदार आणि इतर लोकप्रतिनिधींना मिळणाऱ्या पेन्शनची तरतूद अनेकदा उदार स्वरूपाची असते. काही राज्यांत तर एकाहून अधिक कार्यकाळ झाल्यास पेन्शन वाढत जाते. एखाद्या व्यक्तीने काही वर्षे लोकप्रतिनिधी म्हणून काम केले, तर त्याला आयुष्यभर पेन्शन; पण त्याच गावातील शेतकरी किंवा असंघटित कामगाराला निवृत्तीची कोणतीही खात्री नाही, ही दरी लोकशाहीला शोभणारी आहे का? सामाजिक सुरक्षितता हा काही मोजक्या वर्गाचा विशेषाधिकार नसून सर्व नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. त्यामुळे भारतातही लोकप्रतिनिधींच्या पेन्शन व्यवस्थेचा पुनर्विचार करणे काळाची गरज ठरते. 'पिढ्यान्‌पिढ्या पेन्शन उपभोग घेणाऱ्यांवरचा भार' हा अखेरीस करदात्या जनतेवरच येतो. म्हणूनच आर्थिक शिस्तीची भाषा बोलताना प्रथम स्वतःच्या सुविधांवर मर्यादा आणणे, हा नैतिकतेचा किमान निकष असला पाहिजे. याचा अर्थ लोकप्रतिनिधींना पूर्णतः असुरक्षित ठेवणे असा नाही. सक्षम, प्रामाणिक आणि मध्यमवर्गीय पार्श्वभूमीतील व्यक्ती राजकारणात याव्यात, यासाठी काही प्रमाणात आर्थिक संरक्षण आवश्यक असते. अन्यथा राजकारण केवळ आर्थिकदृष्ट्या सबळ लोकांचेच क्षेत्र ठरेल. परंतु उपाय विशेषाधिकार कायम ठेवण्यात नसून 'समान नियम' लागू करण्यात आहे. लोकप्रतिनिधींसाठीही सामान्य कर्मचाऱ्यांप्रमाणे योगदानाधारित निवृत्ती योजना असू शकते. त्यांनी स्वतःही निवृत्ती निधीत हिस्सा उचलावा, कार्यकाळ आणि योगदानाच्या आधारे लाभ मिळावेत, ही अपेक्षा अवास्तव नाही. आज देशासमोर बेरोजगारी, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक सुरक्षा यांसारखी प्रचंड आव्हाने उभी आहेत. सरकारी तिजोरीवरील प्रत्येक रुपयाचा उपयोग सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी व्हावा, अशी लोकांची अपेक्षा आहे. अशा वेळी लोकप्रतिनिधींनी स्वतःच्या पेन्शन व्यवस्थेचा पुनर्विचार करणे, ती मर्यादित करणे किंवा योगदानाधारित स्वरूपात रूपांतरित करणे, हा केवळ आर्थिक नव्हे तर नैतिक निर्णय ठरेल. लोकशाहीचा गाभा 'समानते'त आहे. कायदे करणाऱ्यांसाठी वेगळे नियम आणि नागरिकांसाठी वेगळे नियम, ही दुटप्पी व्यवस्था दीर्घकाळ टिकत नाही. श्रीलंकेने दाखवलेला मार्ग अंतिम उपाय आहे की तात्पुरता निर्णय, हे काळच ठरवेल; मात्र त्यातून एक स्पष्ट संदेश मिळतो की विशेषाधिकारांचा त्याग हा लोकशाहीतील विश्वास पुनर्स्थापित करण्याचा प्रभावी मार्ग ठरू शकतो. भारतानेही या विषयावर गंभीर सार्वजनिक चर्चा घडवून आणण्याची वेळ आली आहे. आमदार, खासदार आणि इतर लोकप्रतिनिधींच्या पेन्शन व्यवस्थेचा सर्वंकष आढावा घेऊन ती सर्वसामान्यांसारखीच योगदानाधारित आणि मर्यादित करणे, तसेच पिढ्यान्‌पिढ्या चालणाऱ्या लाभांवर अंकुश ठेवणे, हा निर्णय लोकशाहीला अधिक बळकटी देणारा ठरेल. सामाजिक सुरक्षितता सर्वांसाठी समान हक्क म्हणून मान्य झाली, तरच लोकशाहीतील विषमता कमी होईल; अन्यथा विशेषाधिकारांचे कवच बदलले तरी अन्यायाचे वास्तव तसेच राहील.

# जलप्रणेते : डॉ. शंकरराव चव्हाण

शेतकरी, कष्टकरी, सामान्य रयतेच्या सर्वांग कल्याणासाठी आपले आयुष्य झिजवणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार महाराष्ट्रातील अनेक समाजसुधारक, तत्त्वचिंतक आणि राजकीय नेत्यांनी पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकरी सुखी तरच राज्य संपन्न, ही शिवरायांची विचारधारा निष्ठेने पुढे नेणारे नेते म्हणून श्रद्धेय डॉ. शंकरराव चव्हाण यांच्याकडे पाहिले जाते. पुरोगामी, सर्जनशील असणाऱ्या स्वतंत्र महाराष्ट्राच्या राजकीय जडणघडणीत डॉ. शंकरराव चव्हाण यांचे मोठे योगदान राहिले आहे.

१९५२ ला डॉ. शंकरराव चव्हाण हे प्रथम नांदेड नगरीचे नगराध्यक्ष झाले. १९५२ ते २००२ पर्यंत सुमारे पाच दशके त्यांनी महाराष्ट्रासह देशातील राजकीय व्यवस्थेत कुठल्या ना कुठल्या पदावर काम केले. १४ जुलै १९२० ला पैठण येथे एका प्रामाणिक आणि कष्टावरती निस्सीम श्रद्धा असणाऱ्या संस्कारशील कुटुंबात त्यांचा जन्म झाला. १४ जुलै २०१९ ते १४ जुलै २०२० हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष महाराष्ट्रासह देशभरात विविध कार्यक्रमाने साजरे झाले.

प्रशासनातील कठोर शिस्त, स्वच्छ चारित्र्य, अभ्यासू वृत्ती यामुळेच मंत्री म्हणून त्यांना मिळालेल्या प्रत्येक खात्यावर त्यांचा विशेष प्रभाव राहिला आहे. १९५७ ला ते पहिल्यांदा उपमंत्री झाले आणि त्यांच्याकडे महसूल हे महत्त्वाचे खाते आले. त्याकाळातील कमाल जमीन-धारणा कायद्यातील त्रुटी त्यांनी तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून दूर केल्या.

महाराष्ट्राच्या जलसिंचनात त्यांचे अविस्मरणीय योगदान राहिले आहे. सध्या राज्यात जे १८ टक्के सिंचन आहे, त्यातील ८० टक्के सिंचन हे केवळ डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीमुळे निर्माण होऊ शकले. महाराष्ट्रातील बहुसंख्य धरणे त्यांच्याच धोरणातून निर्माण झाली आहेत. जायकवाडीसारखे विशाल



धरण हे केवळ त्यांच्या कठोर मेहनत, सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे उभे राहू शकले. जायकवाडीच्या निर्मितीत अनेक अडथळे होते. तत्कालीन केंद्रीय पाटबंधारे मंत्री व्ही. के. आर. राव हे आंध्रप्रदेशचे होते आणि आंध्र प्रदेशचा या धरणाला कडाडून विरोध होता. त्यातूनच या धरणाच्या उभारणीला २२ हरकती घेतल्या गेल्या. तेव्हा लवादासमोर डॉ. शंकरराव चव्हाण यांनी स्वतः साक्ष दिली. प्रत्येक हरकतीला सडेतोड उत्तर दिले. तेव्हा खुद्द राव म्हणाले की, पाटबंधारे खात्यातील प्रत्येक विषयाचा एवढा अभ्यास असणारा मंत्री मी पाहिला नाही. जायकवाडी प्रकल्पाचे स्वप्न २४ फेब्रुवारी १९७६ ला डॉ. शंकरराव चव्हाण हे मुख्यमंत्री असताना साकार झाले. या प्रकल्पाने ७ लाख एकर जमीन ओलीताखाली आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. जायकवाडी हा प्रकल्प मराठवाड्यातील शेतीसाठी खरेतर वरदान आहे. परंतु गेल्या काही वर्षात जायकवाडी प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरत नाही. नगर, नाशिक जिल्ह्यातील मंडळी मराठवाड्याचे हक्काचे पाणी वळवत आहेत आणि पळवत आहेत. इसापूर धरणाचेही पाणी वळवण्याचा घाट घातला जात आहे. म्हणून मराठवाड्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी व जनतेने समन्यायी पाणी वाटपाच्या धोरणाची काटेकोर अंमलबजावणी व्हावी व मराठवाड्याला आपल्या हक्काचे पाणी मिळावे, यासाठी संघर्ष करण्याची गरज निर्माण झाली आहे.

शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. म्हणून तो सुखाने जगला पाहिजे. पावसाच्या लहरीपणाचा फटका बसून त्यांच्यावर आत्महत्येची वेळ येणार नाही, यासाठी उत्पादनाची हमी देणारी सिंचनाची सोय झाली पाहिजे, हा दूरदृष्टीचा विचार डॉ. शंकरराव चव्हाण यांनी प्रत्यक्ष कृतीत आणला. ते नेहमी म्हणत असत, की पुरेशा पाण्याशिवाय शेती करणे म्हणजे जुगार खेळण्यासारखे आहे. शेती व शेतकरी हा त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. शेतीच्या प्रश्नावर डॉ. शंकरराव चव्हाण हे अत्यंत पोटतिडकीने बोलत आणि काम करीत असत.

डॉ. शंकरराव चव्हाण यांना स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात पाटबंधारे व वीज विभागाची जबाबदारी देण्यात आली. त्यांनी पाटबंधारे मंत्री म्हणून केलेले अद्वितीय स्वरूपाचे काम त्यांच्यातील असामान्यत्वाची प्रचिती देते. त्यांच्या कारकिर्दीत गंगापूर, वीर धरण, खडकवासला, वारणा, गिरणा, घोड, कृष्णा, पूर्णा, मुळा, अप्पर दुधना, भीमा, जायकवाडी, इसापूर, मुळशी, दूधगंगा- वेदगंगा, अप्पर वर्धा, अप्पर पैनगंगा, सुखी, पेच, अप्पर तापी, अप्पर गोदावरी, उजनी, वरसमाव, चाकसमान, हातनूर आदी मोठे, काही मध्यम व इतर शेकडो प्रकल्प त्यांनी हाती घेतले. महाराष्ट्राच्या इतिहासातील पाटबंधारे विभागातील ही एक क्रांती होती. उन्हाळ्यातील तीव्र पाणी टंचाई व पावसाळ्यातील महापूर या समस्यावर मात करण्यासाठी त्यांनी धरणाची अभिनव कल्पना मांडून ती सिद्धीस नेली. पाण्याचा फायदा शेतकऱ्यांना झाला पाहिजे यासाठी प्रकल्पाचा जलद वापर करून घेण्यासाठी त्यांनी एकत्रित कार्यक्रम शासनाकडून करवून घेतला. अन्नधान्याच्या उत्पादन वाढीसाठी, शेतकऱ्यांच्या रब्बी पिकांसाठी विनामूल्य पाणी पुरवठ्याची सोय केली. त्यांनी राज्यातील लागवडीयोग्य जमिनीपैकी जास्तीत जास्त जमिनीस पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने जोरकस प्रयत्न केला. शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी आणण्यासाठी आपल्या मंत्रिपदाच्या काळात क्षण-नि-क्षण प्रयत्न करणारे डॉ. शंकरराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने शेती व शेतकऱ्यांचे उद्धारकर्ते आहेत. सिंचनाची मोठी सोय करून त्यांनी खरी हरितक्रांती केली. मराठवाड्याचे भूमिपुत्र असलेले डॉ. शंकरराव चव्हाण २० फेब्रुवारी १९७५ ला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळातच शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले होते. मुख्यमंत्री म्हणून त्यांनी केलेले कार्य आजही मराठवाडा आणि महाराष्ट्र कधी विसरू शकत नाही.

नांदेड शहराच्या बाजूला गोदावरी नदीवर विष्णुपुरी प्रकल्प त्यांनी उभारला. आशिया खंडातील सर्वात मोठा उपसा जलसिंचन प्रकल्प म्हणून विष्णुपुरी प्रकल्पाकडे पाहिले जाते. या प्रकल्पामुळे सहा लाख लोकसंख्या असणाऱ्या नांदेड शहराच्या पिण्याच्या पाण्याची सोय तर झालीच शिवाय परिसरातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसाठी हक्काचे पाणी मिळाले. डॉ. शंकरराव चव्हाण यांनी पाण्याचे केलेले सुनियोजन व धरणांची बांधणी ह्यामुळे त्यांना जलक्रांतीचे जनक म्हणावे लागेल.

'रान पेटविणे ही खरी क्रांती नव्हे, तर रान भिजविणे हीच खरी क्रांती आहे', अशी त्यांची धारणा होती. डॉ. शंकरराव चव्हाण हे हाडाचे शेतकरी होते. शेती सुधारली पाहिजे, उत्पादन वाढले पाहिजे, जगाला जगवणाऱ्या शेतकऱ्याला जगवले पाहिजे, ही त्यांची तळमळीची भूमिका होती. कृषीमंत्री म्हणून त्यांनी केलेले काम अविस्मरणीय आहे. राज्यातील चार कृषी विद्यापीठांपैकी वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, कोकण कृषी विद्यापीठ त्यांच्या प्रयत्नातून सुरू झाले. सहकारी पद्धतीची शेती हा विचार त्यांनी समोर ठेवून शेती विकासासाठी विविध योजना राबविल्या. त्यांनी महाराष्ट्रात शेती उत्पादन, कृषी शिक्षण, संशोधन, जमीन-धारा सुधारणा- छोटे शेतकरी-शेतमजुरांचा कार्यक्रम, छोटे पाटबंधारे, मृदसंधारण, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मासेमारी आदी योजना यशस्वीपणे राबविल्या. कृषी उन्नतीच्या उदात्त ध्येयाने झपाटलेले डॉ. शंकरराव चव्हाण हे महाराष्ट्रातील कृषी क्रांतीचे प्रणेते आहेत. त्यांचे कृषीविषयक धोरण आजच्याही राजकीय मंडळींना दिशादर्शक आहे.

मराठवाड्याचे शिल्पकार तुम्ही, महाराष्ट्राचे भगीरथ झालात, निःस्वार्थ सेवेचा वारसा तुम्ही, नव्या पिढीला देऊन गेलात...! त्यांच्या असामान्य कार्य कर्तत्वाला शतशः प्रणाम !

**-प्रा. संतोष देवराये,**
मा. अध्यक्ष, डॉ. शंकरराव चव्हाण शारदा धनवर्धिनी सहकारी पतपेढी म. नांदेड.
मो. ९८६०८२०६५७

# ध्येय २०४५ : महासत्ता भारताचे स्वप्न आणि आजच्या पिढीचे सर्वांगीण सक्षमीकरण

२०४५ पर्यंत भारत एक जागतिक महासत्ता बनण्याच्या मार्गावर आहे. आर्थिक विकास, तंत्रज्ञान आणि सामरिक शक्ती या आघाड्यांवर देश सक्षम होत असताना, सर्वात महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो तो म्हणजे या महासत्तेचा कणा असणारी आपली आजची मुले. त्या स्तरावर सक्षम आहेत का? केवळ देशाची प्रगती होऊन चालणार नाही, तर त्या प्रगतीला पेलण्याची आणि वृद्धिंगत करण्याची क्षमता आपल्या पाल्यांमध्ये असणे तितकेच अनिवार्य आहे.

१. बौद्धिकक्षमता आणि लेखनकौशल्य
महासत्ता होण्यासाठी केवळ माहिती असणे पुरेसे नाही, तर ती माहिती योग्य पद्धतीने मांडता येणे आवश्यकआहे.

**बौद्धिकक्षमता** – मुलांना केवळ पाठांतर नव्हे, तर लॉजिकल रिझनिंग आणि एनालिटिकलथिंकिंग मध्ये पारंगत करणे गरजेचे आहे.

**लेखन आणि संवाद कौशल्य :** प्रभावीलेखन आणि संवाद हे जागतिकनेतृत्वाचे प्रमुख साधन आहे. आपले विचार स्पष्टपणे, तर्कशुद्धपणे आणि प्रभावीपणे मांडण्याची कला ज्यांच्याकडे असेल, तेच २०४५ च्या जगात नेतृत्व करतील.

**२.शारीरिक मजबूती आणि आरोग्य**
सुदृढ शरीरातच सुदृढ मन वास करते. महासत्ता बनण्याच्या शर्यतीत धावताना आपल्या मुलांचे शारीरिक आरोग्यसुदृढअसणे ही पहिली अट आहे.

मैदानी खेळ, योगासने आणि संतुलित आहारयातून मिळणारी शारीरिक मजबुती त्यांना



दीर्घकाळ कामकरण्याची ऊर्जा देईल.

वाढत्या स्क्रीन टाइमच्या युगात मुलांना शारीरिक कष्टांची आणि व्यायामाची ओढ लावणे ही पालकांची महत्त्वाची जबाबदारी आहे.

३. मानसिक संतुलन आणि लवचिकता
२०४५ चे जग अत्यंत वेगवान आणि स्पर्धात्मक असेल. अशा काळात ताणतणाव,अपयश आणि आव्हाने येणारच. आपल्या मुलांमध्ये मानसिक संतुलन राखण्याची क्षमता हवी, जेणेकरून ते कोणत्याही परिस्थितीत डगमगणार नाहीत. रेझिलियन्स म्हणजेच संकट काळात पुन्हा उभारी घेण्याची वृत्ती त्यांना मानसिकदृष्ट्या खंबीर बनवेल.

**४. व्यक्तिगत विकास**
मुलांचे व्यक्तिमत्व केवळ त्यांच्या गुणांवरून नाही, तर त्यांच्या वागण्या-बोलण्यावरून ठरते. आत्मविश्वास, वेळेचे नियोजन आणि निर्णयक्षमता या गुणांचा विकास होणे म्हणजेच खरा व्यक्तिगत विकास होय. त्यांना केवळ फॉलोअर्स नाही तर लीडर्स म्हणून घडवणे हेआपलेध्येयअसायलाहवे.

**५. आदर, सन्मानआणि मूल्ये**
कोणताही देश आपल्यासंस्कृती आणि नैतिक मूल्यांशिवाय महान होऊ शकत नाही. आपल्या मुलांमध्ये वडीलधाऱ्यांचा आदर, स्त्री-पुरुषांचा समान सन्मान, आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव असणे आवश्यक आहे.

नैतिक अधिष्ठान असलेली पिढीच देशाच्या संपत्तीचा आणि सत्तेचा विनियोग योग्य पद्धतीने करू शकते. अन्यथा, संस्कारहीन प्रगती ही विनाशाकडे नेणारी ठरू शकते.

**६. पालकांची आणि समाजाची भूमिका**
आपण आपल्या पाल्यांना केवळ डिग्री मिळवण्यासाठी तयार करत आहोत की आयुष्य जगण्यासाठी? २०४५ च्या भारताला अशा नागरिकांची गरज आहे जे तंत्रज्ञानात प्रगत असतील आणि संस्कारांत समृद्ध असतील. पालकांनी मुलांना अपयशाची भीती न घालता नवनवीन प्रयोग करण्याची संधी दिली पाहिजे.

**निष्कर्ष**–देश सर्व मार्गांनी सक्षम होईलच, पण त्या सक्षम देशाचे नागरिक म्हणून आपली मुले ही शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि नैतिकदृष्ट्या तितकीच बलवान असणे गरजेचे आहे. जेव्हा आपली मुले लेखनकौशल्यात निपुण असतील, शरीरयष्टीने मजबूत असतील, मनाने संतुलित असतील आणि मूल्यांनी समृद्ध असतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने २०४५ चा भारत जगाचे नेतृत्व करेल. समृद्ध राष्ट्र ही केवळ स्वप्न पाहणाऱ्यांची नाही, तर स्वतःला समर्थ बनवणाऱ्यांची निर्मिती असते.

**-रोहित विलासराव भोसीकर**
संचालक : भोसीकर फुड्स, नांदेड
मो. ८८०५५७५५५५

# गझल सम्राट : पंकज उधास



आपल्या मलमली आवाजाने गझल गायकीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे संगीत रसिकांचे आवडते गझल गायक पंकज उधास यांचा आज पहिला स्मृतिदिन. मागील वर्षी आजच्याच दिवशी म्हणजे २६ फेब्रुवारी २०२४ रोजी पंकज उधास यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्वातील एक तारा निखळून पडला. पंकज उधास हे भारतातीलच नाही तर जगातील एक प्रमुख गझल गायक म्हणून ओळखले जात होते.

१९८६ साली आलेल्या नाम चित्रपटातील त्यांनी गायलेल्या चिठ्ठी आई है.... आई है...या गाण्याने ते घराघरात पोहचले. हे गाणे आजही तितकेच लोकप्रिय आहे. नाम चित्रपट यशस्वी होण्यात या गाण्याचा खूप मोठा वाटा होता. या गाण्यांनंतर त्यांनी हिंदी चित्रपटात अनेक गाणी गायली. घायल, साजन, ये दिल्लगी, फिर तेरी कहाणी याद आई, मोहरा यासारख्या चित्रपटातून त्यांनी गाणी गायली. त्यांनी गायलेले ना कजरे की धार, आज फिर तुमपे प्यार आता है, जिये तो जीये कैसे, और आहिस्ता अशी कितीतरी गाणी लोकप्रिय झाली व ही सर्व गाणी गाजली ती त्या गाण्यातील अर्थपूर्ण शब्दांनी आणि पंकज उधास यांच्या मधुर आवाजाने. चित्रपटातील त्यांनी गायलेले गाणी लोकप्रिय झाली तरी त्यांची ओळख ही गझल गायक म्हणूनच राहिली. त्यांचे मोठे बंधू मनहर उधास हे देखील प्रख्यात गझल गायक आहेत त्यांनीच पंकज उधास यांना पहिल्यांदा स्टेजवर गझल गाण्याची संधी दिली.

१९७१ साली त्यांनी कर्मा या चित्रपटात पहिल्यांदा पार्श्वगायन केले मात्र त्यांची दखल कोणी घेतली नाही त्यामुळे ते कॅनडाला निघून गेले. तिथे त्यांनी छोट्या मोठ्या समारंभात गाण्यास सुरुवात केली. तिथे ते स्टेज शो देखील करू लागले. त्यांचे स्टेज शो ही लोकप्रिय होऊ लागले. भारतात परतल्यावर त्यांनी अनेक स्टेज शो केले मात्र चित्रपटात त्यांना म्हणावी तशी संधी मिळत नव्हती कारण तो जमाना मोहंमद रफी आणि किशोर कुमार यांचा होता. १९७९ साली त्यांना जवाब या चित्रपटातील मितवा रे मितवा... हे गाणे गाण्याची संधी मिळाली या संधीचे त्यांनी सोने केले. हे गाणे लोकप्रिय झाल्यावर त्यांनी गझल क्षेत्रात करियर करण्याचा निर्णय घेतला.

दरम्यान त्यांनी अनेक गझल गायली. पंकज उधास यांनी एक से बढकर एक गझल गात रसिकांना मंत्रमुग्ध केले. १९८० साली त्यांच्या गाण्याचा पहिला अल्बम आला. त्यानंतर त्यांच्या गाण्यांचा धडाका सुरू झाला. १९८१ साली मुकर्रर, १९८२ साली तरनुम, १९८३ साली महाफिल, १९८५ साली नायाब हे त्यांचे अल्बम आले. या अल्बम मधील सर्व गाणी रसिकांना आवडली. त्यांच्या गझला इतक्या लोकप्रिय झाल्या की रसिकांनी त्यांना गझल सम्राट ही पदवी दिली. सारं काही विसरायला लावणाऱ्या त्यांच्या गझला आजही रसिक गुणगुणताना दिसतात. त्यांनी आपल्या आवाजाने गझल क्षेत्राला आणि गझल गायकीला ऊर्जितावस्था मिळवून दिली.

गझल गायकी लोकप्रिय करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. गझल गायन आणि संगीत क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांच्या याच योगदानासाठी भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या निधनाने संगीत आणि गायन क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. गझल सम्राट पंकज उधास यांना पहिल्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

## एकात्मिक बाल विकास सेवा योजना माहिती पुस्तिकेचे अनावरण

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील महिला व बालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत सुलभपणे पोहोचावी या उद्देशाने महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते मंत्रालयात एकात्मिक बाल विकास सेवा (आसीडीएस) योजनेच्या माहिती पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले.

यावेळी महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, आसीडीएस आयुक्त कैलास पगारे, उपायुक्त विजय क्षीरसागर यांसह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, राज्यातील प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत योजनांची माहिती पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. या समावेशक पुस्तिकेमुळे अंगणवाडी सेवा, पोषण योजना, बालसंवर्धन उपक्रम तसेच नावीन्यपूर्ण कार्यक्रमांची सविस्तर माहिती एका ठिकाणी उपलब्ध होईल. यामुळे योजनांचा लाभ शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचविण्यास मदत होईल.

# व्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित करणारे साहित्य हेच श्रेष्ठ साहित्य- डॉ. आसाराम लोमटे



**नांदेड (प्रतिनिधी) –** प्रस्थापित व्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित करून त्याचे स्वरूप लोकांसमोर मांडणारे साहित्य हेच श्रेष्ठ साहित्य होय, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक आणि साहित्य अकादमी पुरस्कार विजेते डॉ. आसाराम लोमटे यांनी केले. नरहर कुरुंदकर प्रतिष्ठान आणि रुपवेध ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नरहर कुरुंदकर व्याख्यानमालेत 'साहित्य, समाज आणि संवेदनशीलता' या विषयावर ते बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, या अर्थाने श्रेष्ठ साहित्य वाचकांचे स्वास्थ्यहरण करते आणि त्यांच्यात असमाधान निर्माण करते. पण ते केवळ प्रश्न उपस्थित करत नाही तर समाजाचे दुःखहरण करण्याचे देखील प्रयत्न करते. तसेच वर्तमानातील विदारक परिस्थिती मांडत असताना एका चांगल्या जगाचे स्वप्न देखील श्रेष्ठ साहित्य वाचकांसमोर मांडत असते. हे विदारक वास्तव आणि चांगले जग निर्माण करण्याची इच्छा यांच्यात एक झगडा कायमच असतो. या झगड्यातूनच श्रेष्ठ साहित्य निर्माण होते, असे त्यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले.

आपल्या व्याख्यानात डॉ. लोमटे यांनी साहित्य आणि समाज यांच्यातील अनुबंधाचे सविस्तर विवेचन केले. समाजातील घटना-घडामोडींमधून लेखकाला आपले विषय मिळतात. पण जे दिसतं त्या पलीकडचं वास्तव चांगले लेखक मांडत असतात. ते वास्तवाच्या गाभ्यापर्यंत पोहोचतात. त्याच्या मांडणीतून ते वाचकांच्या धारणांना धक्के देत एक नवी दृष्टी देतात आणि आपल्या साहित्यातून लोकांना कृती करायला भाग पाडतात, अशी मांडणी त्यांनी यावेळी केली.

संवेदनशीलता हा चांगल्या लेखनाचा आवश्यक घटक आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले. त्याच्यामुळेच लेखक लिहिता राहतो आणि त्यामुळेच त्याला पुढील लिखाणासाठी बळ मिळते. संवेदनशीलतेचा स्पर्श असलेले साहित्य हे समाजाला समृद्ध करते असेही ते म्हणाले. आपल्या विवेचनाच्या स्पष्टीकरणासाठी डॉ. लोमटे यांनी मुन्शी प्रेमचंद आणि ख्यातनाम ओडिया लेखक फकीर मोहन सेनापती तसेच हिंदी भाषेतील विविध लोकगीतांचा दाखला दिला.

मात्र सध्याच्या काळात संवेदनशीलतेचे प्रमाण समाजातून कमी होत आहे काय असा प्रश्न त्यांनी यावेळी उपस्थित केला. एकीकडे माध्यमे आपल्याला बधिर करत आहेत तर बाजार केंद्रीय व्यवस्थेच्या परिणामामुळे आपण सगळे ग्राहक होत चाललेलो आहोत, अशी खंत देखील त्यांनी यावेळी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्रीनिवास पांडे यांनी केले तर वक्त्यांचा परिचय डॉ. विश्वाधार देशमुख यांनी करून दिला. डॉ. लोमटे यांचे स्वागत लक्ष्मण संगेवार आणि विश्वास कुरुंदकर यांनी केले. याप्रसंगी नांदेड मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रतिष्ठानचे ज्येष्ठ विश्वस्त लक्ष्मण संगेवार तसेच महाराष्ट्र शासनाचा श्री. पु. भागवत प्रकाशक पुरस्कार मिळाल्याबद्दल निर्मल प्रकाशनचे संस्थापक निर्मलकुमार सूर्यवंशी यांचा डॉ. लोमटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# तख्त सचखंड श्री हजूर अबिचलनगर साहिब नांदेड येथे दि.१ ते ४ मार्चपर्यंत होला-महल्ला सणानिमित्त विविध कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी) –** येथील गुरुद्वारा तख्त सचखंड श्री अबिचलनगर साहिब येथे होला महल्ला सणानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे या वर्षीही दि. १ मार्च ते ४ मार्च दरम्यान आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमानिमित्त दि. १ मार्च पासून तख्त सचखंड साहिब येथे प्रसिध्द कविशर, ढाडी, प्रचारक सकाळ आणि संध्याकाळ कीर्तन, प्रवचन होणार. दि. २ मार्च रोजी रात्री सिख सेवक जत्था दिल्ली स्टेट यांच्या वतीने व गुरुद्वारा बोर्डाच्या सहकार्याने विशेष कीर्तन दरबार आयोजित करण्यात आला आहे. तसेच दि.३ मार्च २०२६ रोजी भाई जैमलसिंघ सहगल परिवार मुंबई व गुरुद्वारा बोर्डाच्या सहकार्याने ७६ वा रैण सबाई कीर्तन दरबार संपन्न होणार आहे. हे किर्तन दरबार रात्री ९ वाजता सुरू होईल, अशी माहिती देण्यात आली आहे.

दि. ४ मार्च रोजी 'होला महल्ला' (हल्लाबोल) कार्यक्रम साजरा होणार आहे. या निमित्त धार्मिक परंपरेनुसार दुपारी १२ वाजता गुरु साहिबचे पवित्र शस्त्रांचे पूजन करण्यासाठी मुख्यद्वार समोर ठेवण्यात येतील व धार्मिक रीतीरिवाजानुसार धार्मिक वाणीचे पठन, पूजन, भजन, तिलक करण्यात येईल व सायंकाळी ४ वाजता परंपरेनुसार अरदास करुन जत्थेदार सिंघ साहिब संत बाबा कुलवंतसिंघजी व पंजप्यारे साहिबान यांच्या मार्गदर्शनाखाली गुरु साहिबचे निशान साहिब, घोडे, नगारे, भजन मंडली, किर्तनी जत्थे, गतका पार्टी ईत्यादी व हजारोंच्या संख्येने भाविकांसह भजन, कीर्तन करीत हा धार्मिक होला महल्ला (हल्ला बोल) गुरुद्वारा गेट नं.१ पासून प्रारंभ होईल व सायंकाळी ६ वाजता महावीर चौक (हल्लाबोल चौक) येथे पोहचुन परंपरेप्रमाणे हल्लाबोल साजरा होईल. नंतर हे नगर कीर्तन बाऊली साहिब येथे पोहचल्यावर रहेरास साहिबचे पाठ व अरदास करुन परंपरागत मार्गाने गुरुद्वारा नगिनाघाट साहिब येथे पोहचतील. नंतर रात्री १०:३० पर्यंत तख्त सचखंड साहिब येथे पोहचून नगर कीर्तनाचा समारोप होईल, असेही कळविण्यात आले आहे.

होला महल्ला सणानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही हजारोंच्या संख्येत भाविक दर्शनासाठी येणार आहेत. भाविकांच्या व्यवस्थेसाठी प्रशासक डॉ. विजय सतबीरसिंघ यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुद्वारा बोर्डाचे समूह अधिकारी, कर्मचारी यांना लंगर, पाणी, निवास, वैद्यकीय सुविधा, स्वच्छता, अस्थाई निवास व्यवस्था तसेच कर्मचाऱ्यांची २४ तास अतिरिक्त सेवा पुरविण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. जेणेकरुन भाविकांची सर्व प्रकारची उत्तम व्यवस्था व्हावी व त्यांना कोणत्याही प्रकारची कमतरता होऊ नये याची दक्षता घेण्यात यावी, असे सुचीत करण्यात आले आहे.

## विद्यापीठात 'बालरंगभूमी व शिक्षणातील नाट्य' विषयावर व्याख्यानाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी) –**प्रभावी शिक्षणाकरिता नाट्यकलेची उपयोगिता, व्यक्तिमत्व विकासाच्या अनुषंगाने शिक्षणात नाट्यकलेचे वाढत जाणारे महत्व व निर्माण होणाऱ्या विविध व्यवसायाच्या संधीचा विचार करता स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील ललित व प्रयोगजीनी कला संकुलाच्या नाट्य व चित्रपट विभागातर्फे दि.२५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता क्वेस्ट, सोनाळे या संस्थेचे निनाद उचले यांचे 'बालरंगभूमी व शिक्षणातील नाट्य' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

क्वेस्ट ही संस्था मागील काही काळापासून ग्रामीण व आदिवासी शाळांतील मुलांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण व वाचन-लेखन, आणि सर्जनशील शिक्षण कार्यक्रम विकसित करण्यावर काम करते, या संस्थेचा मुख्य उद्देश आहे भाषिक साक्षरता व मुलांच्या शिक्षणाची गुणवत्ता वाढवणे. सदरील संस्था ही नाट्यकला व शिक्षण प्रक्रियेची सांगड घालण्याच्या अनुषंगानेही अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी ओळखली जाते, तसेच या संस्थेमार्फत दरवर्षी काही निवडक तरुण नाट्य कलावंताना 'गोष्टरंग फेलोशीप' प्रदान केली जाते. सदरील व्याख्यानादरम्यान गोष्टरंग फेलोशीपची निवड प्रक्रिया, कार्यपध्दती, सृजनशील कामांच्या संधी व लाभ आदींविषयी सविस्तर माहिती दिली जाणार आहे.

शहरातील तरुण, युवा नाट्य कलावंत, नाट्यसंस्था व शाळा-महाविद्यालयांमध्ये सृजनशील अध्यापनाचे काम करू इच्छिणाऱ्यांनी सदरील व्याख्यानाचा लाभ घ्यावा व अधिक माहितीसाठी संयोजक, नाट्य व चित्रपट विभाग प्रा. राहुल गायकवाड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन ललित व प्रयोगजीवी कला संकुलाचे संचालक डॉ. पृथ्वीराज तौर यांनी केले आहे.

# सर्व विभागांनी समन्वय ठेवून उद्दिष्टपूर्ती करावी - डॉ. निधी पांडे

## कृषी संलग्न विभागांचा घेतला आढावा



**नांदेड (प्रतिनिधी) –** जिल्ह्यात कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या योजनांचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ मिळावा व दिलेली उद्दिष्टे विहित वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून कार्य करावे, अशा सूचना प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेच्या केंद्रीय नोडल अधिकारी तथा भारत सरकार राजभाषा विभागाच्या संयुक्त सचिव डॉ. निधी पांडे यांनी दिल्या.

बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात कृषी विभागाशी संलग्न विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अजय शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. देशमुख, कृषी उपसंचालक वानखेडे, प्रकल्प उपसंचालक आत्मा अनिल शिरफुले, जलसंधारण अधिकारी कांबळे, रेशीम विभागाच्या तंत्र अधिकारी कांचन जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

डॉ. पांडे म्हणाल्या की, जिल्ह्यासाठी कृषी विभागाने तयार केलेल्या जिल्हा आराखड्यात आवश्यक त्या सुधारणा करून उद्दिष्टपूर्ती वेळेत करावी. तसेच यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या यंत्रसामुग्रीबाबत त्यांचा अभिप्राय व अडचणी जाणून घ्याव्यात. शेतकऱ्यांशी सातत्याने संपर्क ठेवून व्हॉट्सअॅप गटांच्या माध्यमातून समन्वय साधावा व त्यांच्या समस्या तात्काळ सोडवाव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या. जिल्ह्यातील कृषी विभागाच्या कामकाजाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी कृषी विभागामार्फत जिल्ह्यात एआयचा वापर, चिया व मका लागवडीस प्रोत्साहन, १ लाख जलतारा उद्दिष्ट, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मोफत बियाणे वाटप, फार्मर कपतर्फे ५५० शेतकऱ्यांना तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण, महाडीबीटी अंतर्गत लाभ वितरण, यांत्रिकीकरण, तसेच रब्बी हंगामातील पेरणी आदी बाबींचे सादरीकरण करण्यात आले.

तसेच पशुसंवर्धन विभागाच्या योजना, महारेशीम अभियानाची उद्दिष्टपूर्ती, रेशीम शेतीचे फायदे, मत्स्यव्यवसाय विभागाची शेततळे व मत्स्यपालनातील कामगिरी, पशुसंवर्धनातील लसीकरण व दूध उत्पादनवाढीच्या उपाययोजना यांची माहिती देण्यात आली. यासोबत जिल्हा उपनिबंधक, ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा उद्योग केंद्र, फार्मर कप, सिंचन, जिल्हा जलसंधारण विभाग, नाबार्ड, कापूस संशोधन केंद्र, अग्रणी बँक आदी विभागांचाही सविस्तर आढावा घेण्यात आला.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील सर्व विभागांचे काम सुव्यवस्थित सुरू असून पशुसंवर्धन विभागाचे कार्य विशेष प्रगतीपथावर असल्याचे नमूद केले. तसेच मत्स्यपालन क्षेत्रातही जनजागृती वाढताना दिसत असल्याचे सांगितले. सर्व योजनांचा लाभ तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व विभागांचे सहकार्य आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना अंतर्गत आज सकाळी नांदेड तालुक्यातील धनगरवाडी येथील रेशीम शेती व विविध केंद्र पुरस्कृत योजना याबाबत संयुक्त सचिव डॉ. निधी पांडे यांनी पाहणी दौरा केला. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत व तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल व संपूर्ण चमू व रेशीम उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

## मुदखेड येथे संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची जयंती साजरी



**मुदखेड (प्रतिनिधी) –** शहरात २४ फेब्रुवारी रोजी संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न. पा. नगराध्यक्ष प्रतिनिधी माधव पाटील कदम हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपाचे नेते प्रवीण गायकवाड, पोलीस निरीक्षक धिरज चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक बी. आर. कांबळे, नगरसेविका निकीता संजय सोनटक्के, पाणी पुरवठा सभापती शाम अण्णा चंद्रे, नगरसेवक संजय आऊलवार, नगरसेवक प्रतिनिधी संजय सोनटक्के, उपेंद्र देवदे, नितीन चौदंते, नईम अण्णा बागवान, माजी उपनगराध्यक्ष शंकर राठी, एकबाल कुरेशी, माजी नगरसेवक गंगाधर डांगे, कैलास गोडसे, प्रकाश बलफेवाड, उमाकांत घोंगडे, महादू चमकुरे, मुजीब पठाण, प्रभाकर पांचाळ, संदीप मोडवान, किशोर पाटील पारवेकर, राम अबादार, शिवानंद देवके, सुरेश शेट्टे, पत्रकार मनोज कमटे, हफीज कुरेशी, साहेबराव गागलवाड, साहेबराव हौसरे, प्रल्हाद मस्के, सुनील चव्हाण, विजय होळकर, चांदू बोकेफोड, गजानन कमळे, जय राजवाडीकर, संदीप पाटील गाढे, कपील लोखंडे, साजन जोंधळे, संजय चव्हाण,पिंटु ठाकुर,ब्बलु जानिमीया, ज्ञानेश्वर गायकवाड यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष सावंत यांनी केले.

## मांजरम येथे ६ वे ग्रामीण साहित्य संमेलन संपन्न

### जगन गोणारकर यांना समाजभूषण तर डी. के. वाघमारे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित



**नांदेड (प्रतिनिधी)–** नायगाव तालुक्यातील मांजरम येथे मूकनायक वाचनालय मांजरम व संसरंगी साहित्य मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने ६ वे जनसंवाद राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलन नुकतेच पार पडले.

यावेळी या संमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक तथा विचारवंत प्राचार्य डॉ. रामकृष्ण बदने, उद्घाटक युवा उद्योजक तथा जि.प. माजी सदस्य बालाजी बच्चेवार, प्रमुख पाहुणे नांदेडचे तत्कालीन अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, स्वागत अध्यक्ष सचिन कांबळे पुणे, निमंत्रक शिवाजी कानकेवाड, डॉ. सुरेश वाघमारे, रिपाईचे मधुकर मांजरमकर, अ‍ॅड. विजय गोणारकर, भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष हौसाजी वारघडे, जिल्हाध्यक्ष रणजित गोणारकर, ग्रामीण कवी तथा राज्य अध्यक्ष नागोराव डोंगरे, मूकनायक वाचनालय ग्रंथपाल जीवन मांजरमकर, संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, एकनाथ कार्लेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मांजरम गावातील प्रमुख रस्त्याने ग्रंथ दिंडी काढण्यात आली.

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तद्नंतर परिसंवाद व कथाकथन कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे मानव कल्याण विचार मंच नांदेड अध्यक्ष जगन गोणारकर यांना समाज भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तर डी. के. वाघमारे यांना जीवन गौरव पुरस्कार, श्रीकांत गोणारकर यांना सामाजिक पुरस्कार, किशोर वाघमारे कौठेकर यांना सांस्कृतिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## निर्मलकुमार सूर्यवंशी यांचा 'छावा'तर्फे सन्मान



**नांदेड (प्रतिनिधी) –**साहित्य क्षेत्रात अत्यंत प्रतिष्ठेचा मानला जाणारा महाराष्ट्र शासनाचा 'श्री. पु. भागवत उत्कृष्ट प्रकाशक पुरस्कार २०२५' नांदेडचे भूमिपुत्र आणि 'निर्मल प्रकाशन'चे सर्वेसर्वा निर्मलकुमार सूर्यवंशी यांना जाहीर झाला आहे. या गौरवशाली यशाबद्दल छावा मराठा संघटनेच्यावतीने सूर्यवंशी यांचा यथोचित सन्मान करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

नांदेडच्या एका भूमिपुत्राने प्रकाशन व्यवसायातील आपली स्वतंत्र ओळख निर्माण करून हा राज्यस्तरीय बहुमान मिळवणे ही संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. या पुरस्काराचे स्वरूप ५ लाख रुपये रोख, मानचिन्ह व मानपत्र असे असून, येत्या २७ फेब्रुवारी रोजी 'मराठी भाषा गौरव दिनी' नाशिक येथे त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

त्यांच्या या देदीप्यमान यशाबद्दल छावा मराठा संघटनेच्या वतीने निर्मलकुमार सूर्यवंशी यांचा ग्रंथ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. या प्रसंगी छावा मराठा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष इंजि. तानाजी हुस्सेकर यांच्यासह डॉ. नागेश कल्याणकर, डॉ. प्रभाकर जाधव, शिवानंद पाटील, दीपक पाटील, गोटू पाटील राजूरकर, गणेश वडजे, साहेबराव भोसले आणि जयंत भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

## भोकर येथे शनिवारी 'विधी सेवा महाशिबीर' व शासकीय योजनांच्या महामेळाव्याचे आयोजन

**भोकर (प्रतिनिधी) –** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, दिल्ली यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण, मुंबई, प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र ब्रह्मे, जिल्हा प्रशासन व तालुका विधी सेवा समिती भोकर तसेच अभिवक्ता संघ भोकर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी भोकर येथे 'विधी सेवा महाशिबीर' आणि शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. हनुमान नगर येथील किनवट रोडवरील खुल्या मैदानावर सकाळी १०:३० वाजता हा सोहळा पार पडणार आहे.

या महामेळाव्याचे उद्घघाटन मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाचे माननीय न्यायमूर्ती संदीप कुमार सी. मोरे आणि नागपूर खंडपीठाचे माननीय न्यायमूर्ती तथा नांदेड जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती नीरज पी. धोटे यांच्या शुभहस्ते होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र के. ब्रम्हे हे असतील. या प्रसंगी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मेघना कावली आणि पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी आणि विधी क्षेत्रातील मान्यवर या मेळाव्याला मार्गदर्शन करणार आहेत.

## सगरोळीच्या माजी विद्यार्थ्यांचा औंढा नागनाथ येथे मेळावा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी) –** राज्यात सर्वदूर नावलौकिक असलेल्या सगरोळी येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल शारदानगर शाळेच्या १९६९-७० साली दहावी उत्तीर्ण झालेल्या मित्रांचे चौथे गेट टूगेदर औंढा नागनाथ येथील सावता माळी मंदिर सभागृहात पार पडले.

मराठवाड्याच्या विविध ठिकाणांहून छपन्न वर्षानंतर वर्गमित्रांनी रविवारी औंढा नागनाथ गाठले. या गेट टूगेदरमध्ये वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेले २० वर्गमित्र एकत्र जमा झाले. आयोजक तथा यजमान नरसिंग पतंगे यांनी चहापान व अल्पोपहाराची व्यवस्था केली. सभागृहात आयोजित कार्यक्रमात सर्व मित्रांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

प्रारंभी सर्व मित्रांनी आपापला परिचय व कुटुंबाची माहिती दिली. याप्रसंगी एन. जी. वाघमोडे यांचे सुपुत्र शिक्षक व पत्रकार कुलदीप नंदूरकर यांनी ज्येष्ठांशी गप्पा व विविध मनोरंजनात्मक खेळ घेतले. चिठ्ठ्यातील मजकुर सादरीकरणाच्या खेळात एन. जी. वाघमोडे यांनी हिंदी कविता सादर केली. व्यंकट भरडे यांनी तुकडोजी महाराजांचे अभंग सादर केले. सुतार यांनी गीत सादर केले. सर्व मित्रांनी दुपारच्या जेवणाचा आस्वाद घेतला.

यावेळी बसवंत घेवारे, आनंदा पायरे, व्यंकट भरडे, रामराव कोरे, दत्ता गायकवाड, नामदेव कांबळे, गोविंद येरावार, निवृत्ती वाघमोडे, गंगाधर देवाले, शंकर जोशी, हेमचंद्र देशमुख, चांदू वाघमारे, भुजंग गायकवाड, विठ्ठल सुतार, नारायण कोटगीरे, गुरुलिंग मठवाले, आयोजक नरसिंग पतंगे, गावातील प्रतिष्ठित नागरिक बालासाहेब शिंदे, संदीप सोनुने, बी. के. खिल्लारे, पांडे म.रा. व वाशीमकर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार व्यंकट भरडे यांनी मानले. यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

**पान १ वरून...**

**अजितदादांची बारामती..**

पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत पोटनिवडणूक लढण्यावर एकमत झाले आहे. बारामती विधानसभेची प्रारूप मतदार यादी १० मार्चला प्रसिद्ध झाल्यानंतर कोणत्याही क्षणी निवडणुकीची घोषणा होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा निवडणूक बिनविरोध करण्यावर भर असणार आहे.

आगामी राज्यसभा निवडणुकीत पार्थ पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार असतील, असा निर्णय पक्षाकडून घेण्यात आल्याची माहिती आहे. सोमवारी रात्री मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसच्या झालेल्या पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत हा निर्णय झाल्याची माहिती आहे. सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत पार्थ पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

## सहसचिव डॉ. निधी पांडे व जिल्हाधिकारी डॉ. राहुल कर्डिले यांची विष्णुपुरी जिल्हा परिषद हायस्कूलला भेट

**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –**लातूर विभागात पीएमश्री योजने अंतर्गत प्रथम आलेल्या विष्णुपुरी जिल्हा परिषद शाळेस भारत सरकारचे सहसचिव डॉ. निधी पांडे व नांदेड जिल्हाधिकारी डॉ. राहुल कर्डिले यांनी २४ फेब्रुवारी रोजी भेट देऊन पाहणी केली. यावेळी विद्यार्थी व पालकांशी सुसंवाद साधला. तसेच भौतिक सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता या बाबींचे निरीक्षण केले.



पीएमश्री योजना ही एक राष्ट्रीय शैक्षणिक धोरण एनईपी-२०२० च्या अंतर्गत सरकारी शाळांचा दर्जा उंचवणारी केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेअंतर्गत देशभरात १५,५०० हून अधिक सरकारी शाळांना पीएमश्री शाळेचा दर्जा प्राप्त झालेला आहे. या शाळा मॉडल शाळा म्हणून विकसित केल्या जात असून, डिजिटल शिक्षण, आधुनिक पायाभूत सुविधा, आणि सर्वांगीण विकासावर भर देऊन गुणवत्तेचे नेतृत्व करतात. महाराष्ट्रातही या योजनेअंतर्गत अनेक शाळांची निवड करण्यात आली असून, त्यांचा कायापालट केला जात आहे. त्यातील नांदेड जिल्ह्यातील एक नामांकित शाळा म्हणून मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा योजने अंतर्गत लातूर विभागात प्रथम आलेली शाळा म्हणजे पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी होय. ही शाळा पीएमश्री योजनेअंतर्गत असल्या कारणाने तसेच लातूर विभागात प्रथम आलेली शाळा असल्यामुळे भारत सरकारच्या सहसचिव डॉ. निधी पांडे यांच्या मार्गदर्शनात नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. राहुल कर्डिले, नांदेड जि. प. चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मुक्कावार, शिक्षण अधिकारी सौ. वंदना फुटाणे, सलगर, बनसोडे, शिक्षण विभागातील अन्य अधिकाऱ्यांनी पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी या शाळेला २४ फेब्रुवारी रोजी भेट देऊन शाळेतील विद्यार्थी आणि पालकांशी संवाद साधला.

भौतिक सुविधा शैक्षणिक गुणवत्ता इत्यादी बाबींचे निरीक्षण करून पीएमश्री योजनेपूर्वीची आणि पीएमश्री योजनेनंतर शाळेची स्थिती जाणून घेतली. या योजनेच्या माध्यमातून शाळेच्या प्रगतीचा अहवाल पीपीटीच्या माध्यमातून शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. उज्वला जाधव आणि शिवाजी वेदपाठक यांनी सर्व मान्यवरांना दाखवला. मान्यवरांनी विद्यार्थी, पालक, शालेय व्यवस्थापन समितीचे सन्माननीय सर्व सदस्य, यांच्याशी शैक्षणिक चर्चा करून शाळेतील वर्ग, भौतिक सुविधा, शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत आहार, इत्यादी बाबींचे निरीक्षण करून शाळेतील सर्व शिक्षकांचे कौतुक केले.

याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विलास देशमुख हंबर्डे, माजी जि. प. सदस्य साहेबराव हंबर्डे, माणिकराव हंबर्डे, शिवाजीराव हंबर्डे, विश्वनाथराव हंबर्डे, विष्णुपुरी ग्रामपंचायतच्या सरपंच संध्याताई हंबर्डे, उपसरपंच अर्चना विश्वनाथराव हंबर्डे,राजेश हंबर्डे, पोलीस पाटील प्रवीण हंबर्डे, अमृत हंबर्डे व इतर गावातील प्रतिष्ठित नागरिक, पालक उपस्थित होते.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

# महागडे प्रोडक्ट्स नव्हे, योग्य दिनचर्या आहे गरजेची... जाणून घ्या स्किन केअरचे A to Z

**आजच्या काळात धूळ, प्रदूषण आणि ताणतणावाचा परिणाम सर्वात आधी त्वचेवर दिसतो. तुम्हाला तुमच्या त्वचेची काळजी घ्यायला सुरुवात करायची असेल, तर हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की स्किनकेअर हे कठीण काम नाही. योग्य दिनचर्या म्हणजे महागडी उत्पादने नसून तुमच्या त्वचेच्या गरजा समजून घेणे आहे. मूलभूत स्किनकेअर दिनचर्या दोन भागात विभागली गेली आहे: सकाळ (सकाळी) आणि रात्री (संध्याकाळ). सकाळ आणि संध्याकाळची स्किनकेअर दिनचर्या समजून घेऊया...**



## सकाळची दिनचर्या

तुमच्या सकाळच्या दिनचर्येचा मुख्य उद्देश तुमच्या त्वचेला हायड्रेट करणे आणि सूर्याच्या हानिकारक किरणांपासून संरक्षण करणे आहे. सकाळी उठल्यानंतर सौम्य फेस वॉशने तुमचा चेहरा धुवा. यामुळे रात्रभर त्वचेवर साचलेले तेल आणि घाम निघून जातो. चेहरा धुतल्यानंतर तुमची त्वचा हायड्रेट ठेवणे महत्वाचे आहे. तुमच्या त्वचेच्या प्रकारानुसार हलके मॉइश्चरायझर लावा. हे ओलावा टिकवून ठेवते. सर्वात महत्वाचे पाऊल म्हणजे तुम्ही घरात असाल किंवा बाहेर सनस्क्रीन लावायला कधीही विसरू नका. ते तुमच्या त्वचेचे अकाली वृद्धत्व, सुरकुत्या आणि टॅनिंगपासून संरक्षण करते. किमान SPF 30 असलेले सनस्क्रीन लावण्याची खात्री करा.

## रात्रीची दिनचर्या

रात्र त्वचेच्या दुरुस्तीची वेळ आहे. तुमच्या त्वचेच्या पेशी रात्री स्वतःची दुरुस्ती करतात, म्हणून ही दिनचर्या महत्त्वाची आहे. जर तुम्ही दिवसा मेकअप किंवा सनस्क्रीन लावला असेल तर तो पूर्णपणे काढून टाकणे महत्वाचे आहे. प्रथम क्लींजिंग मिल्क किंवा तेलाने तुमचा चेहरा स्वच्छ करा, नंतर फेस वॉश वापरा. जर तुमची त्वचा तेलकट असेल तर तुम्ही टोनर वापरू शकता. ते त्वचेची pH पातळी संतुलित करते आणि छिद्र स्वच्छ ठेवते. जर तुम्हाला काळी वर्तुळे किंवा मुरुमांसारख्या समस्या असतील तर रात्रीच्या वेळी उपचार उत्पादने किंवा आय क्रीम लावा. तुमच्या त्वचेला रात्री खोल पोषण आवश्यक आहे. हायलुरोनिक ॲसिड किंवा सिरॅमाइड्स असलेले मॉइश्चरायझर निवडा, जे तुमची त्वचा रात्रभर दुरुस्त करू शकते.

## काही महत्त्वाच्या गोष्टी...

- पॅच टेस्ट : तुमच्या संपूर्ण चेहऱ्यावर कोणतेही नवीन उत्पादन लावण्यापूर्वी, ते तुमच्या हातावर २४ तास चाचणी करून पहा की त्यामुळे जळजळ होते का.
- धैर्य बाळगा : कोणत्याही त्वचेची काळजी घेण्याच्या दिनचर्येला निकाल दिसण्यासाठी किमान ४ ते ६ आठवडे लागतात. म्हणून रात्रीतून चमत्काराची अपेक्षा करू नका.
- पाणी प्या : बाहेरून लावलेली उत्पादने फक्त तेव्हाच काम करतील जेव्हा तुमचे शरीर आतून हायड्रेटेड असेल. दिवसभर भरपूर पाणी प्या.
- तुमच्या त्वचेचा प्रकार ओळखा : तुमच्या त्वचेचा प्रकार जाणून घेतल्याशिवाय कोणतेही उत्पादन खरेदी करू नका. जर तुमची त्वचा खूप संवेदनशील असेल तर तज्ज्ञांचा सल्ला नक्कीच घ्या.



# कंटाळवाण्या हेअरस्टाईलला म्हणा बाय बाय...

## लग्नाच्या हंगामात लांब केसांना द्या सेलिब्रिटी स्पर्श



**लग्नाचा हंगाम सुरू आहे. प्रत्येक मुलीला प्रत्येक कार्यक्रमात सर्वात सुंदर आणि स्टायलिश दिसायचे असते. तुमचा ड्रेस आणि मेकअप जितका महत्त्वाचा आहे तितकीच तुमची हेअरस्टाईलही महत्त्वाची आहे. विशेषतः जर तुमचे केस लांब आणि जाड असतील, तर ते स्टाईल करण्यासाठी तुमच्याकडे अनेक पर्याय आहेत. पण योग्य हेअरस्टाईल निवडणे महत्त्वाचे आहे, जे तुमच्या पोशाख आणि चेहऱ्याच्या आकाराशी जुळते आणि तुमचा लूक पूर्ण करते. येथे काही उत्तम हेअरस्टाईल आहेत ज्या या लग्नाच्या हंगामात तुमचा लूक खास आणि अनोखा बनवतील.**

- सॉफ्ट वेव्ही ओपन हेअर : उघड्या केसांवरील सॉफ्ट वेव्ह एक अतिशय सुंदर लूक तयार करतात. ही स्टाइल एक कॅज्युअल आणि आश्चर्यकारक फील तयार करते, विशेषतः हळदी, मेहंदी किंवा संगीत फंक्शन्ससाठी. तुमची इच्छा असल्यास, तुम्ही मिड-पार्टिंग देखील वापरू शकता आणि तुमच्या केसांना टीका किंवा स्टोन पिन जोडू शकता.



- गजरा फिशटेल वेणी केशरचना : फिशटेल वेणीभोवती पांढरे किंवा रंगीत गजरे गुंडाळून तुम्ही पारंपरिक आणि आधुनिक लूकचे सुंदर मिश्रण मिळवू शकता. ही केशरचना साड्या आणि लेहेंगा दोन्हीसह छान दिसते.
- केसांच्या ॲक्सेसरीजसह लो बन : लो बन ही एक क्लासिक केशरचना आहे जी तुम्ही मोत्याच्या पिन किंवा स्टोन क्लिपने सजवू शकता. हा लूक रिसेप्शन किंवा संध्याकाळच्या फंक्शनसाठी योग्य आहे.
- हाफ-अप हाफ-डाउन हेअरस्टाईल : जर तुम्हाला तुमचे केस उघडे ठेवायचे असतील पण तरीही काही स्ट्रक्चर हवे असेल, तर ही स्टाईल परिपूर्ण आहे. वरचा भाग वळवा किंवा वेणीने कापून घ्या आणि खालचा भाग हलवा किंवा कर्ल करा.
- गजरा असलेला पारंपरिक बन : भारतीय लग्नांमध्ये गजऱ्याचे स्वतःचे आकर्षण आहे. गजऱ्याने साधा किंवा गोंधळलेला बन सजवून तुम्ही शाही आणि पारंपारिक दोन्ही दिसू शकता.
- फ्लोरल क्राउन वेणी : फुलांनी सजवलेली क्राउन वेणीची हेअरस्टाईल तुम्हाला मेहंदी किंवा दिवसाच्या कार्यक्रमात परीसारखा लूक देईल. ही स्टाईल तुम्हाला ताजेतवाने आणि तरुण दिसायला लावेल.
- साईड-स्वीप्ट कर्ल : ही स्टाईल ग्लॅमरस लूकसाठी परिपूर्ण आहे. तुमचे केस एका बाजूला विभाजित करा आणि खोल कर्ल तयार करा. ही हेअरस्टाईल गाऊन आणि ऑफ-द-शोल्डर ड्रेसेससह सुंदर दिसते.
- डच ब्रेड बन : डच वेणी मागे घ्या आणि ती बनमध्ये बदला आणि मोती किंवा फुलांच्या पिन घाला. ही हेअरस्टाईल पारंपरिक आणि फ्यूजन दोन्ही पोशाखांना शोभते.
- रोप ब्रेड पोनीटेल : ही स्टाईल अद्वितीय आणि ट्रेंडी आहे. लांब पोनीटेलमध्ये वेणी तयार करा आणि केसांच्या ॲक्सेसरीजने सजवा. ज्यांना आधुनिक लूकसह प्रयोग करायचे आहेत त्यांच्यासाठी हे परिपूर्ण आहे.

जीन्ससोबत झुमके अन् काचेच्या बांगड्या...

# देसी मॅक्सिमॅलिझम का होतेय तरुणाईत लोकप्रिय?

अलीकडेपर्यंत सोशल मीडियावर पेस्टल रंग, साधे कपडे आणि मेकअपशिवाय दिसणारा लूक दिसायचा. असे वाटत होते, की मिनिमॅलिझम हा एकमेव फॅशन नियम बनला आहे. मात्र हवेची दिशा पुन्हा पुन्हा बदलली आहे. न्यूट्रल रंगांचा कंटाळा आल्याने खणखणणाऱ्या बांगड्या, पायावर अल्ता ( अल्ता म्हणजे स्त्रियांकडून पायांना आणि हातांना लावला जाणारा गडद लाल रंग. याला महावर असेही म्हणतात ), मोगऱ्याचा गजरा आणि हेवी व्हिंटेज दागिन्यांनी भव्य पुनरागमन केले आहे. आजची आधुनिक पिढी बोल्ड, रंगीत आणि उत्साही 'देसी मॅक्सिमॅलिझम'ला पसंती देत आहेत. मॅक्सिमॅलिझम म्हणजे फक्त जास्त गोष्टी असणे नाही. त्यात स्वतःला मुक्तपणे व्यक्त करणे देखील समाविष्ट आहे. त्यात दोलायमान रंग, जोरदार भरतकाम केलेले कपडे, असंख्य बांगड्या आणि कपाळावर बिंदी यांचा समावेश आहे.

## देसी मेकअपचे का पुनरागमन?

- ओळख शोधणे : जागतिकीकरणाच्या या युगात सर्वकाही सारखे झाले आहे. तरुणाईला जाणवत आहे की पाश्चात्य मिनिमलिझमच्या मागे लागून ते त्यांच्या मुळांपासून दूर जात आहेत. बांगड्या घालणे, पायांना अल्ता लावणे आणि केसांना गजरा लावणे हे केवळ फॅशन बनले नाही तर संस्कृतीशी जोडण्याचा एक मार्ग बनले आहे.
- सोशल मीडिया आणि व्हिज्युअल अपील : सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर तोच कंटेट जास्त लक्ष वेधतो जो व्हिज्युअली रिच असतो. साधा पांढरा कुर्ता, रंगीत दुपट्टा, कानातले आणि गडद रंगाचा अल्ता कॅमेऱ्याच्या तुलनेत अधिक आकर्षक आणि सौंदर्यपूर्ण दिसतो. कंटेंट निर्मात्यांसाठी त्यांची सर्जनशीलता प्रदर्शित करण्यासाठी हा एक नवीन कॅनव्हास आहे.
- जुन्या आठवणींचे आकर्षण : आजची पिढी त्यांच्या आजींच्या जुन्या छायाचित्रांमधून प्रेरणा घेत आहे. ज्या काळात मेकअप हा एक विधी होता तो काळ आजच्या जलद-फॅशन युगात अविश्वसनीयपणे दिलासादायक वाटतो. चमेलीच्या फुलांचा सुगंध आणि बांगड्यांचा आवाज यात एक आकर्षण आहे जे मिनिमलिझम कधीही देऊ शकले नाही.
- डिजिटल थकवा : लोक सर्वत्र एकसारखे, मोहक आणि परिपूर्ण दिसण्याने कंटाळले आहेत. मॅक्सिमॅलिझम उत्साही आहे, तो



आनंदी आणि निश्चिंत स्वभावाचे प्रतिबिंब आहे. जो कोणत्याही नियमांनी बांधला जाऊ इच्छित नाही.
- परंपरेचे मिश्रण: मनोरंजक म्हणजे, लोक ही शैली पारंपरिक दृष्टिकोन म्हणून नव्हे तर एक मिश्रण म्हणून स्वीकारत आहेत. जीन्ससह जाड चांदीच्या ब्रेसलेट घालणे किंवा को-ऑर्डर सेटसह अल्ता घालणे ही नवीन फॅशन बनली आहे. हा ट्रेंड दर्शवितो की फॅशन चक्र नेहमीच परत येते.

# व्यायामानंतर लगेच आंघोळ करणे आवश्यक?

**व्यायाम किंवा जिम सत्रानंतर आपण अनेकदा घामाने भिजून जातो. मात्र कधीकधी, आळस किंवा वेळेअभावी, आपण आंघोळ करण्यास उशीर करतो. तुम्हीही असे करत असाल तर काळजी घ्या. त्वचा विशेषज्ञ म्हणतात, की घाम येणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, परंतु जर तुम्ही ती तुमच्या शरीरावर बराच काळ राहू दिली तर ती तुमच्या त्वचेसाठी खूप हानिकारक ठरू शकते.**





घामामध्ये मीठ, विषारी पदार्थ आणि बॅक्टेरिया असतात, जे त्वचेच्या पृष्ठभागावर जमा होऊ शकतात आणि छिद्रांना ब्लॉक करू शकतात. यामुळे त्वचेला योग्यरित्या श्वास घेण्यास अडथळा येतो आणि जळजळ, खाज सुटणे आणि पुरळ येऊ शकते, विशेषतः संवेदनशील त्वचा असलेल्यांमध्ये. आंघोळ करण्यास उशीर केल्याने बॅक्टेरिया आणि बुरशी वाढण्याची संधी मिळते. कसरत केल्यानंतर शरीर उबदार आणि ओलसर राहते, ज्यामुळे बॅक्टेरिया आणि बुरशीजन्य संसर्गासाठी एक आदर्श वातावरण तयार होते. यामुळे पाठीवर पुरळ, बुरशीजन्य संसर्ग, जॉक इच आणि त्वचेच्या पटीत खाज येणे यासारख्या समस्या वाढू शकतात. ज्यांना आधीच मुरुमे किंवा पुरळ आहेत त्यांच्यासाठी ही स्थिती आणखी बिकट होऊ शकते.

## घाम सुकल्याने सुटका नाही...

घाम सुकल्यानंतर त्वचेवर मीठाचा थर तयार होतो, ज्यामुळे ती कोरडी आणि खडबडीत वाटते. हा थर त्वचेच्या नैसर्गिक तेलांना देखील नुकसान करतो, ज्यामुळे त्वचेचा अडथळा कमकुवत होतो. जर हे दीर्घकाळ चालू राहिले तर त्वचा निस्तेज दिसू शकते आणि अकाली वृद्धत्वाची चिन्हे दिसू शकतात.

## संसर्गापासून त्वचेचे संरक्षण

व्यायाम केल्यानंतर लगेच किंवा २०-३० मिनिटांच्या आत गरम आंघोळ करणे त्वचेसाठी फायदेशीर मानले जाते. यामुळे घाम, घाण आणि बॅक्टेरिया धुऊन जातात, ज्यामुळे त्वचा ताजी वाटते. आंघोळ करताना, सौम्य क्लींजर वापरावे आणि नंतर, मॉइश्चरायझर लावणे महत्वाचे आहे, जेणेकरून त्वचा ओलसर राहील आणि कोणत्याही प्रकारची जळजळ किंवा संसर्ग टाळता येईल.

# बटाट्याच्या सालीने उजळवा चेहरा, जाणून घ्या पद्धत...

**चेहऱ्यावरील काळे डाग दूर करण्यासाठी तुम्ही काय करता ? लोक सहसा क्रीम वापरतात. तथापि, ही पद्धत प्रत्येकाच्या त्वचेसाठी काम करत नाही. जर तुम्हाला कोणत्याही दुष्परिणामांशिवाय चेहरा उजळवायचा असेल तर तुम्ही योगगुरू कैलाश बिश्नोई यांनी सुचवलेल्या पद्धतीचे अनुसरण करू शकता.बटाट्याच्या साली आणि स्वयंपाकघरातील एक किंवा दोन इतर घटकांची आवश्यकता असेल.**



- चेहऱ्यावर काळे डाग का ? : मेलेनिनचे उत्पादन वाढणे, हानिकारक सूर्यकिरणे, हार्मोनल बदल, लोहाची कमतरता, अनुवांशिक घटक.
- क्रीम का काम करत नाहीत ? : क्रिम नेहमीच काळ्या डागांवर काम करत नाहीत. कारण प्रत्येकाची त्वचा खूप वेगळी असते. शिवाय क्रिममध्ये विविध रसायने असतात. ही रसायने त्वचेसाठी योग्य नसतील तर समस्या निर्माण करू शकतात.
- बटाट्याची साल वापरा : प्रथम बटाटे धुवून पूर्णपणे सोलून घ्या. आता साल मिक्सरच्या भांड्यात घ्या. दही आणि थोडे पाणी घाला आणि ते एकत्र बारीक करा. तुम्ही हे मिश्रण किमान २-३ महिने वापरावे. बटाट्याची साल त्वचेला उजळवते. डाग कमी करते. चेहऱ्यावर नैसर्गिक चमक आणते.
- तांदळाचा वापर : तांदूळ प्रत्येक घरात आढळतो. तुम्हाला बटाट्याच्या सालीचा रस भातामध्ये मिसळावा लागेल. दोन्ही घटक मिक्सरमध्ये टाकून बारीक करा. तयार केलेली पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर लावा आणि सुकल्यानंतर धुवा. या दोन स्टेप फॉलो करूनही तुम्ही तुमच्या चेहऱ्यावर नैसर्गिक चमक पाहू शकता.


# डार्क सर्कलवर शोधला उपाय !; बनवली रात्रीची अंडर आय क्रीम...

**तुमच्या डोळ्यांखालील काळी वर्तुळे कमी होत नाहीत का ? या समस्येचे निराकरण करण्यासाठी लोक अनेकदा बाजारात उपलब्ध असलेल्या महागड्या, केमिकल-युक्त क्रीमचा अवलंब करतात. यामुळे त्वचेच्या अनेक समस्या उद्भवू शकतात. अशा परिस्थितीत, तुम्ही कंटेंट क्रिएटर जिग्यासाने सुचवलेली एलोवेरा नाईट क्रीम वापरून पाहू शकता. ती तुमच्या त्वचेसाठी खूप फायदेशीर ठरू शकते. तर, चला अंडर आय क्रीम कशी बनवायची ते जाणून घेऊया...**

अंडर आय क्रीम त्वचेच्या काळजीचा एक महत्त्वाचा भाग आहे. पण तुम्हाला माहिती आहे का ही क्रीम लावणे इतके महत्त्वाचे का आहे ? ही क्रीम फुगीरपणा आणि सूज दूर करते. सुरकुत्या कमी करते. वृद्धत्वाची लक्षणे लपवण्यास मदत करते. रासायनिक क्रीममुळे डोळ्यांना जळजळ आणि सूज येऊ शकते. डोळ्यांमध्ये लालसरपणा येऊ शकतो. त्यामुळे नैसर्गिक क्रीमचाच वापर करायला हवा.

## अशी बनवा

१ चमचा कोरफड जेल, १ चमचा नारळ तेल, १ चमचा मध घ्या. एका भांड्यात कोरफड वेरा जेल घ्या. त्यात नारळ तेल आणि मध घाला. सर्व घटक चांगले मिसळा. डोळ्यांभोवती लावा आणि हलक्या हाताने मालिश करा. तुम्ही ही क्रीम रात्रभर तशीच राहू द्यावी. डोळ्यांखाली कोरफडी लावल्याने काळी वर्तुळे, सूज आणि बारीक रेषा यासारख्या समस्या टाळता येतात. ते त्वचेला खोलवर मॉइश्चरायझ करते आणि हायड्रेट करते, ज्यामुळे तिला आराम मिळतो. यामुळे तुमचा एकूण लूक देखील वाढतो.



# भारताच्या सौर उत्पादनांच्या आयातीवर तब्बल १२६ टक्के टॅरिफ, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर ट्रम्प यांची मनमानी सुरूच

**नवी दिल्ली(प्रतिनिधी)** – अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना सुप्रीम कोर्टात टॅरिफच्या मुद्यावर अपयश आल्यानंतर ते कमालीचे आक्रमक झाले आहेत. अमेरिकन सुप्रीम कोर्टानं डोनाल्ड ट्रम्प यांचा टॅरिफचा निर्णय बेकायदेशीर ठरवला होता. यानंतर ट्रम्प यांनी पहिल्यांदा सर्व देशांवर १० टक्के टॅरिफ लागू करत असल्याची घोषणा केली. यानंतर पुढे जात ट्रम्प यांनी ते १० वरुन १५ टक्क्यांपर्यंत वाढवलं. आता अमेरिकेनं भारत, इंडोनेशिया आणि लाओस या सारख्या देशांमधील सौर उत्पादनांच्या आयातीवर मोठ्या प्रमाणात टॅरिफ लावलं आहे. अमेरिकेनं भारतीय सौर उत्पादनांवर १२६ टक्के टॅरिफ लादलं आहे. यामुळं या निर्णयाचा परिणाम सौर ऊर्जा क्षेत्रातील कंपन्यांवर झाला आहे.

ब्लूमबर्गच्या रिपोर्टनुसार अमेरिकेच्या वाणिज्य विभागानं भारतातून आयात केल्या जाणाऱ्या सौर उत्पादनांच्या आयातीवर १२६ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली आहे. इंडोनेशियासाठी



हे शुल्क ८६ टक्के १४३ टक्क्यांदरम्यान असेल. लाओस साठी हे शुल्क ८१ टक्के निर्धारीत करण्यात आलं आहे. आयात शुल्काचे दर विदेशातील सब्सिडी लक्षात घेत तयार करण्यात आली आहेत. अमेरिकेच्या मते या देशातील निर्यातदार अमेरिकेमधील देशांतर्गत सौर ऊर्जा उत्पादकांच्या तुलनेत कमी किमतीवर उत्पादन निर्यात करण्यास परवानगी मिळते. ट्रम्प यांच्या प्रशासनाकडून अधिक टॅरिफ लावण्याचं कारण म्हणजे देशांतर्गत सौर ऊर्जा उत्पादकांना अधिक लाभ पोहोचवणं आहे.

अमेरिकेकडून भारतीय सौर उत्पादनांवर १२६ टक्के टॅरिफ लादण्यात आल्यानं भारतीय निर्यातीवर परिणाम होईल. या कंपन्यांच्या शेअरमध्ये घसरण पाहायला मिळू शकते. वाणिज्य मंत्रालयाची आकडेवारी पाहिली असता २०२४ मध्ये भारतानं अमेरिकेला ७९२.६ दशलक्ष डॉलरची निर्यात केली होती. गेल्या काही दशकांमध्ये भारताची सौर ऊर्जा निर्यात वाढली होती. ट्रम्प यांनी ज्या तीन देशांना टारगेट केलेलं आहे त्या देशांकडून अमेरिकेनं ४.५ अब्ज डॉलर्सची सौर उत्पादनांची आयात केली होती.

रिपोर्टनुसार २०२५ च्या पहिल्या सहा महिन्यात अमेरिकन सौर ऊर्जा उत्पादनांच्या एकूण आयातीपैकी ५७ टक्के आयात भारत, इंडोनेशिया आणि लाओसमधून केली होती. यामुळं डोनाल्ड ट्रम्प यांनी या तीन देशांवर टॅरिफ लादण्याचा घेतलेला निर्णय धक्कादायक मानला जात आहे.

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून ४२ मौलिक ग्रंथांचे प्रकाशन

**मुंबई(प्रतिनिधी)**–मराठी भाषा गौरव दिना-निमित्त महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे यंदा ४२ मौलिक ग्रंथांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. हा प्रकाशन सोहळा नाशिक येथील मराठा विद्या प्रसारक समाजाचे के.टी.एच.एम. महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आला आहे.

मंडळाच्या स्थापनेपासून 'पुस्तक प्रकाशन' हे मुख्य उद्दिष्ट ठेवून गंभीर, वैचारिक, संशोधनपर आणि मौलिक विषयांवरील ग्रंथनिर्मिती सातत्याने केली जात आहे. खासगी प्रकाशकांकडून सहसा प्रकाशित न होणारे उच्च दर्जाचे संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित करण्याची जबाबदारी मंडळ पार पाडत आहे. आजवर मंडळाने ७३० हून अधिक ग्रंथ प्रकाशित केले असून दरवर्षी मराठी भाषा गौरव दिनी नव्या ग्रंथांचे प्रकाशन करण्याची परंपरा जपली आहे.

यंदाच्या ४२ ग्रंथांमध्ये विविध क्षेत्रांतील महत्त्वपूर्ण साहित्याचा समावेश आहे. वारकरी परंपरेतील संतश्रेष्ठ संत तुकाराम महाराज यांच्या 'तुकारामबावांच्या अभंगाची गाथा' या ग्रंथाचा समावेश विशेष उल्लेखनीय आहे. तसेच अंजली मालकर लिखित 'हिंदुस्थानी अभिजात संगीताचा इतिहास' (पूर्वार्ध व उत्तरार्ध) या दोन खंडांत तेराव्या शतकापासून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्या संगीत प्रवासाचा अभ्यासपूर्ण आढावा घेण्यात आला आहे.

मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्यावरील 'दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर कर्तृत्वाचा एक शोध' हे तीन खंड प्रकाशित होत असून, त्यातील तिसऱ्या खंडात त्यांनी प्रथम मुद्रित केलेली 'ज्ञानेश्वरी' समाविष्ट आहे.

'शिवशक्ती संप्रदायाची लोक–गान परंपरा', 'महाराष्ट्राचे शिल्पकार विद्वत्तेचा महामेरु डॉ. सी. डी. देशमुख', 'मराठीतील रहस्य–रंजनप्रधान लोकप्रिय कादंबरी परंपरा आणि प्रवाह', तसेच ओडिसी नृत्यशैलीवरील 'ओद्रमागधी ते ओडिसी नृत्य एक प्रवास' हेही ग्रंथ प्रकाशित होत आहेत.

१९४० ते १९९० या कालखंडातील महत्त्वाच्या साहित्यिकांवर आधारित परिचयात्मक ग्रंथमालिकेतील ग्रंथांचाही समावेश आहे. यात पु. ल. देशपांडे, नामदेव ढसाळ, विंदा करंदीकर, अण्णाभाऊ साठे, नारायण सुर्वे आदी साहित्यिकांच्या जीवन व साहित्याचा मागोवा घेण्यात आला आहे. तसेच 'रायगडची जीवनकथा' या ग्रंथाचे आठवे पुनर्मुद्रण प्रकाशित होत असून या ग्रंथाला वाचकांचा मोठा प्रतिसाद लाभला आहे.

मंडळाच्या 'नवलेखक अनुदान' योजनेअंतर्गत यंदा १९ नवोदित लेखकांची पुस्तके प्रकाशित होत आहेत. काव्य, कथा, कादंबरी, नाटक, ललितगद्य आणि बालवायय अशा विविध साहित्यप्रकारांतील ही पुस्तके असून नवोदितांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा मंडळाचा हा उपक्रम विशेष उल्लेखनीय आहे. मंडळाचे सर्व ग्रंथ https://sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

# भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोगाचा राष्ट्रीय व घटनात्मक हितासाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार

**मुंबई(प्रतिनिधी)** – भारत निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयुक्त यांची राष्ट्रीय गोलमेज परिषद मंगळवारी भारत मंडपम, नवी दिल्ली येथे पार पडली. तब्बल २७ वर्षांनंतर ही परिषद आयोजित करण्यात आली होती.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद पार पडली. यावेळी निवडणूक आयुक्त डॉ. सुखबिर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी उपस्थित होते. या परिषदेत देशातील ३० राज्यांच्या राज्य निवडणूक आयोगांनी सहभाग नोंदवला.

भारत निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोगांनी ही राष्ट्रीय गोलमेज परिषद दरवर्षी आयोजित करण्याचा ठराव एकमताने मंजूर केला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखाली सर्व राज्य निवडणूक आयुक्तांनी 'राष्ट्रीय जाहीरनामा २०२६' स्वीकारण्याचा निर्णय घेतला. अचूक व परिपूर्ण मतदार याद्यांची तयारी ही लोकशाहीची भक्कम पायाभरणी असल्याचे सांगून, पारदर्शक आणि कार्यक्षम निवडणूक प्रक्रिया लोकशाही संस्थांना अधिक सक्षम करते, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

राष्ट्रीय आणि घटनात्मक हित लक्षात घेऊन, निवडणूक प्रक्रियेत समन्वय वाढवण्यासाठी परस्पर मान्य यंत्रणा व कायदेशीरदृष्ट्या सक्षम चौकट विकसित करण्याचा प्रस्ताव भारत निवडणूक आयोगाने मांडला. यात ईसीआयएनईटी, ईव्हीएम, मतदार याद्या तसेच इंडिया इंटरनॅशनल इंन्स्टिट्यूट ऑफ डेमॉक्रसी आणि इलेक्शन मॅनेजमेंट (आयआयआयडीईएम) या जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण संस्थेच्या पायाभूत सुविधांचा परस्पर वापर करण्याचा समावेश आहे.

घोषणापत्रात पंचायत व महानगरपालिका निवडणुकांशी संबंधित कायदे आणि संसद व राज्य विधानमंडळ निवडणुकांशी संबंधित कायद्यांमध्ये सुसंगती साधण्यावर भर देण्यात आला आहे. राष्ट्रीय व घटनात्मक हित अधिक बळकट करण्यासाठी परस्पर सहकार्य वाढवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे मुंबई येथून प्रयाण



**मुंबई(प्रतिनिधी)**– राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे आज सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून प्रयाण झाले.

राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांना राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी निरोप दिला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, महापौर रितू तावडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते.

तसेच लेफ्ट जनरल डी. एस. कुशवाह, एयर वाईस मार्शल पी. एस. वाडोदकर, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# एसटी कर्मचाऱ्यांचा वेतन वाढीचा थकीत हप्ता त्यांच्या बँक खात्यात जमा

**मुंबई(प्रतिनिधी)**–राज्याच्या कानाकोपऱ्यात धावणाऱ्या 'लालपरी'ला आपल्या घामाने आणि कष्टाने जिवंत ठेवणाऱ्या सुमारे ८६ हजार एसटी कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर अखेर समाधानाची झळाळी उमटली आहे. वेतनवाढीचा थकीत हप्ता त्यांच्या बँक खात्यात जमा होताच, दिलेला शब्द पाळणाऱ्या परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा विश्वासाची मोहर उमटली.

एसटी महामंडळाकडे निधीअभावी थकीत वेतन देणे कठीण झाले असताना शासनाने तातडीने १०० कोटी रुपयांची तरतूद केली. परिणामी, फेब्रुवारी महिन्याच्या थकीत वेतनवाढीचा हप्ता कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा झाला. हा केवळ आर्थिक दिलासा नसून, तो शासनाच्या संवेदनशीलतेचा आणि बांधिलकीचा प्रत्यय आहे. असे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

यापूर्वी ऑक्टोबर २०२५ मध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व तत्कालीन उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांच्या सहमतीने कामगार संघटनांच्या बैठकीत दरमहा सुमारे ६५ कोटी रुपयांचे अनुदान देण्याचे घोषित केले होते. त्यानुसार डिसेंबरपासून थकीत हप्त्यांची प्रक्रिया सुरू झाली. मात्र काही तांत्रिक अडचणींमुळे फेब्रुवारीत निधीअभावी हप्ता देणे अशक्य झाले आणि कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीची लाट उसळली.

## नगर परिषद भोकर

## जाहीर प्रगटन

गोविंद पंडित कदम गट क्र. २८५, प्लॉट क्र. --, जुना वार्ड नं. ५, जुना मालमत्ता क्र. डी-३०१/१४६ व डी-३०१/१४७ नवीन वार्ड नं. १६, नवीन मालमत्ता क्र. १६३८/१४६ व डी-१६३८/१४७ ची महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे श्रेणीवाढ नियंत्रण) सुधारणा अधिनियम २०२१ च्या अनुषंगाने गुंठेवारी मिळण्यासाठी दि. १४/११/२०२६ रोजी न. प. नोंदणी कृत आर्कीटेक्ट व इंजिनिअर यांच्या द्वारे संचिका सादर केली आहे. जागेची रुंदी-उत्तर-दक्षिण ३० चौरस फुट, लांबी -पूर्व पश्चिम ८० चौरस फुट.
चतु:सीमा पुढीलप्रमाणे-
पूर्वेस-रस्ता,
पश्चिमेस-रस्ता,
दक्षिणेस-रस्ता,
उत्तरेला-प्लॉट क्र. ९ व १८.
वरील चतु:सीमेतील महाराष्ट्र गुंठेवारी विकास नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण सुधारणा अधिनियम २०२१ च्या अनुषंगाने गुंठेवारीबाबत कोणाची काही हरकत असल्यास संबंधितांनी आवश्यकत लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ४ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगर परिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे. मुदतीनंतर प्राप्त हरकतीनंतर कोणताही उजर ऐकून घेतला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, भोकर**

## Change In Name

My Old Name is SHAHAPURWAD VIDHYA VYANKATI Now I am Changing as a new Name VIDYA VYANKATI SHAHAPURWAD Hence Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. FULL ADDRESS - ND -11/6 GHAR NO 11-5-457, SHIV MANDIR JAVAL, CIDCO NEW NANDED, KAUTHA, NANDED MAHARSHTRA, 431603 MO. 8888929133

## Change In Name

My Old Name is ABHISHEK ANANDRAO KALYANKAR Now I am Changing as a new Name ABHISHEKH ANANDRAO KALYANKAR Hence Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. FULL ADDRESS- ASHIRWAD NAGAR TARODA Bk. NANDED Tq. & Dist. Nanded

## Change In Address

I am SABEEHA SULTANA SHAIKH AHMED My Old Address H. No. 9-6-84 Hyder Bagh No. 2 Degloor Naka Nanded MAHARASHTRA INDIA Hence Forth My All Correspondence will be done as per my New Address- KHATIZA COLONY MILLAT NAGAR DEGLOOR NAKA POST OFFICE ITWARA NANDED MAHARASHTRA INDIA.

# महाराष्ट्र शासन आणि ब्रिस्टॉल विद्यापीठ यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार




**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रातील गुणवंत विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या उच्च शिक्षणाच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि ब्रिस्टॉल विद्यापीठ मुंबई कॅम्पस प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात विधानभवन येथे सामंजस्य करार करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सामंजस्य कराराच्यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, ब्रिस्टॉल विद्यापीठाच्या कुलगुरू व अध्यक्षा प्रा.एव्हलिन वेल्च, ब्रिस्टॉल विद्यापीठाच्या मुख्य संचालन अधिकारी लुसिंडा पार, संचालक ज्युलिया हॉल, मुख्य कार्यकारी अधिकारी अश्विन दामेरा आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ब्रिस्टॉल विद्यापीठासारख्या जागतिक कीर्तीच्या संस्थेसोबत करार होणे ही अभिमानाची बाब आहे. या सहकार्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या आणि त्यासाठी सक्षम असलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना मोठी संधी उपलब्ध होणार आहे. शासन आणि अॅकॅडेमिया एकत्र आले तर आपण नक्कीच उज्ज्वल भविष्य निर्माण करू शकतो, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च प्रतीचे शिक्षण

या करारानुसार 'मुख्यमंत्री व ब्रिस्टॉल विद्यापीठ शिष्यवृत्ती योजना' संयुक्तपणे विकसित व राबविण्यात येणार आहे. सामाजिक व आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च प्रतीचे शिक्षण मिळावे, हा या योजनेमागील प्रमुख उद्देश आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या संपूर्ण कालावधीसाठी १०० टक्के शिक्षण शुल्क माफ करण्यात येईल. या शिष्यवृत्तीचा संपूर्ण खर्च ब्रिस्टॉल विद्यापीठ मुंबई कॅम्पसकडून उचलण्यात येणार आहे.

# महाराष्ट्रातील व्याघ्र संवर्धनासमोर मोठे आव्हान: वर्षात ४१ वाघांना मुकलो, मानवनिर्मित कारणांमुळे धोक्यात वाढ



**मुंबई (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र राज्यामध्ये २०२५ या एकाच वर्षात तब्बल ४१ वाघांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती वनमंत्र्यांनी विधानसभेत लेखी उत्तराद्वारे सादर केली आहे. या मृत्यूंच्या कारणांचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, २८ वाघांचा मृत्यू नैसर्गिक कारणांनी झाला असला तरी, उर्वरित १३ वाघांचा बळी हा मानवी हस्तक्षेप आणि अपघातांमुळे गेला आहे; यात ८ वाघ विविध अपघातांमध्ये, ४ वाघ विजेचा धक्का लागल्याने, तर १ वाघ शिकारीमुळे दगावला आहे.

या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर सरकारने रेल्वे आणि रस्ते अपघात रोखण्यासाठी वनक्षेत्रातील प्रस्तावित प्रकल्पांमध्ये वन्यप्राण्यांच्या सुरक्षित वावरासाठी अंडरपास व ओव्हरपास बांधण्याचे निर्देश दिले आहेत, तसेच रेल्वेचा वेग ताशी ४० किमीपर्यंत मर्यादित ठेवण्याच्या सूचनाही केल्या आहेत. शिकारीच्या संकटाचा सामना करण्यासाठी 'विशेष व्याघ्र संरक्षण दल' सक्रिय करण्यात आले असून, वनपरिक्षेत्र स्तरावर खबऱ्यांची जाळी, बिनतारी यंत्रणा आणि तपासणी नाक्यांद्वारे कडक पाळत ठेवली जात आहे. याशिवाय, वाघांच्या भ्रमणमार्गावर कॅमेरा ट्रॅप बसवणे, पंधरवड्यातून एकदा त्यांच्या अस्तित्वाचा मागोवा घेणे आणि पाणवठ्यांवरील विषप्रयोगासारख्या घटना रोखण्यासाठी नियमित गस्त घालणे अशा उपाययोजना राबविल्या जात आहेत.

व्याघ्र प्रकल्पांवर मोठ्या प्रमाणात खर्च होत असतानाही वाघांचे होणारे मृत्यू ही पर्यावरणाच्या दृष्टीने गंभीर बाब असून, मानव-वन्यजीव संघर्ष रोखणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे रक्षण करणे, हेच खऱ्या अर्थाने संपूर्ण जंगलव्यवस्थेच्या संरक्षणासाठी अत्यावश्यक आहे.

## नगर परिषद भोकर

## जाहीर प्रगटन

शिवाजी नारायणराव पांचाळ गट क्र. २८४, प्लॉट क्र. --, जुना वार्ड नं. ५, जुना मालमत्ता क्र. डी-३०१/१४५ नवीन वार्ड नं. १६, नवीन मालमत्ता क्र. १६३८/१४५ ची महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे श्रेणीवाढ नियंत्रण) सुधारणा अधिनियम २०२१ च्या अनुषंगाने गुंठेवारी मिळण्यासाठी दि. १४/११/२०२६ रोजी न. प. नोंदणी कृत आर्कीटेक्ट व इंजिनिअर यांच्या द्वारे संचिका सादर केली आहे. जागेची रुंदी-उत्तर-दक्षिण ४० चौरस फुट, लांबी -पूर्व पश्चिम ३० चौरस फुट.
चतु:सीमा पुढीलप्रमाणे-
पूर्वेस-धारजनीकर यांचा प्लॉट, पश्चिमेस-रोड, दक्षिणेस-मालकी जागा, उत्तरेला-शेख रेश्मा शेख मौल्ला.
वरील चतु:सीमेतील महाराष्ट्र गुंठेवारी विकास नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण सुधारणा अधिनियम २०२१ च्या अनुषंगाने गुंठेवारीबाबत कोणाची काही हरकत असल्यास संबंधितांनी आवश्यकत लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ४ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगर परिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे. मुदतीनंतर प्राप्त हरकतीनंतर कोणताही उजर ऐकून घेतला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, भोकर**

## नगर परिषद भोकर

## जाहीर प्रगटन

रफीक सरवर शेख व इतर गट क्र. ५५४, प्लॉट क्र. ४३, जुना वार्ड नं. ३, जुना मालमत्ता क्र. १९२५, नवीन वार्ड नं. ०२, नवीन मालमत्ता क्र. ११५७ ची महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे श्रेणीवाढ नियंत्रण) सुधारणा अधिनियम २०२१ च्या अनुषंगाने गुंठेवारी मिळण्यासाठी दि. १४/११/२०२६ रोजी न. प. नोंदणी कृत आर्कीटेक्ट व इंजिनिअर यांच्या द्वारे संचिका सादर केली आहे. जागेची रुंदी-उत्तर-दक्षिण ३० चौरस फुट, लांबी -पूर्व पश्चिम ४० चौरस फुट.
चतु:सीमा पुढीलप्रमाणे-
पूर्वेस-६.१० मीटर रस्ता,
पश्चिमेस-प्लॉट क्र. ७८,
दक्षिणेस-प्लॉट क्र. ४२,
उत्तरेला-प्लॉट क्र. ४४.
वरील चतु:सीमेतील महाराष्ट्र गुंठेवारी विकास नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण सुधारणा अधिनियम २०२१ च्या अनुषंगाने गुंठेवारीबाबत कोणाची काही हरकत असल्यास संबंधितांनी आवश्यकत लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ४ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगर परिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे. मुदतीनंतर प्राप्त हरकतीनंतर कोणताही उजर ऐकून घेतला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, भोकर**

## नगर परिषद भोकर

## जाहीर प्रगटन

श्री प्रकाश सीताराम जाधव गट क्र. ९, प्लॉट क्र. --, जुना वार्ड नं. ३, जुना मालमत्ता क्र. ७२३, नवीन वार्ड नं. ०३ मधील नवीन मालमत्ता क्र. ७१२ ची महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे श्रेणीवाढ नियंत्रण) सुधारणा अधिनियम २०२१ च्या अनुषंगाने गुंठेवारी मिळण्यासाठी दि. ४/११/२०२६ रोजी न. प. नोंदणी कृत आर्कीटेक्ट व इंजिनिअर यांच्या द्वारे संचिका सादर केली आहे. जागेची रुंदी-उत्तर-दक्षिण २५ चौरस फुट, लांबी -पूर्व पश्चिम ३५चौरस फुट.
चतु:सीमा पुढीलप्रमाणे
पूर्वेस-इम्रान हाजी इद्रीस यांची जमीन, पश्चिमेस-लिंगूराम यांची जागा, दक्षिणेस-रस्ता, उत्तरेला-विक्री करणाऱ्याचा उर्वरित भाग.
वरील चतु:सीमेतील महाराष्ट्र गुंठेवारी विकास नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण सुधारणा अधिनियम २०२१ च्या अनुषंगाने गुंठेवारीबाबत कोणाची काही हरकत असल्यास संबंधितांनी आवश्यकत लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ४ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगर परिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे. मुदतीनंतर प्राप्त हरकतीनंतर कोणताही उजर ऐकून घेतला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, भोकर**

## नगर परिषद भोकर

## जाहीर प्रगटन

श्री मौलासाब जमालसाब नुर बास गट क्र. ४८३, प्लॉट क्र. २०, जुना वार्ड नं. ५, जुना मालमत्ता क्र. ए-५७९, नवीन वार्ड नं. १० मधील नवीन मालमत्ता क्र. १५०३ ची महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे श्रेणीवाढ नियंत्रण) सुधारणा अधिनियम २०२१ च्या अनुषंगाने गुंठेवारी मिळण्यासाठी दि. ४/११/२०२६ रोजी न. प. नोंदणी कृत आर्कीटेक्ट व इंजिनिअर यांच्या द्वारे संचिका सादर केली आहे. जागेची रुंदी-उत्तर-दक्षिण ३० चौरस फुट, लांबी -पूर्व पश्चिम ४० चौरस फुट.
चतु:सीमा पुढीलप्रमाणे
पूर्वेस-४.५७ मीटर रस्ता,
पश्चिमेस-प्लॉट क्र. १९,
दक्षिणेस-प्लॉट क्र. ३७
उत्तरेला-प्लॉट क्र. ३.
वरील चतु:सीमेतील महाराष्ट्र गुंठेवारी विकास नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण सुधारणा अधिनियम २०२१ च्या अनुषंगाने गुंठेवारीबाबत कोणाची काही हरकत असल्यास संबंधितांनी आवश्यकत लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ४ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगर परिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे. मुदतीनंतर प्राप्त हरकतीनंतर कोणताही उजर ऐकून घेतला जाणार नाही.


**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, भोकर**

## पाहिजे

कुशल आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन/मोटार वाईडींग अनुभव व तसेच आय.टी.आय. टर्नर ट्रेड अनुभव किमान ५ वर्षे असावा. कमीत कमी वेतन १५,०००/- रू.
इच्छुकांनी खालील पत्यावर संपर्क करावा.
**-: संपर्क पत्ता :-**
**उषा इलेक्ट्रीकल वर्क्स,**
**सिडको एम.आय.डी.सी. नांदेड**
**मो.नं. ९९६०१२८१९१**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.
संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## कंधार तालुक्यात पानभोसी केंद्रावर पेपर संपेपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांनी ठाण मांडले!

- जिल्ह्यात ९८.२४ टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती
- जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांच्या भरारी पथकामार्फत निगरानी

**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्ह्यात इयत्ता बारावीच्या जीवशास्त्र विषयाची परीक्षा जिल्ह्यातील १०९ केंद्रांवर बुधवारी सुरळीतपणे पार पडली. एकूण २१ हजार ९३७ परीक्षार्थ्यांपैकी २१ हजार ५५० विद्यार्थी उपस्थित राहिले असून, उपस्थितीचे प्रमाण ९८.२४ टक्के नोंदविण्यात आले.



प्रत्येक परीक्षा केंद्रावर बैठे पथकांमार्फत झूम वेबकास्टद्वारे तसेच ड्रोन आणि व्हीडीओ कॅमेराच्या सहाय्याने संपूर्ण वेळ परीक्षेवर नियंत्रण ठेवण्यात आले. त्यामुळे सर्व १०९ केंद्रांवर परीक्षा शांततापूर्ण व कॉपीमुक्त वातावरणात पार पडल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली. कंधार तालुक्यातील पानभोसी येथील नेताजी सुभाषचंद्र बोस उच्च माध्यमिक विद्यालय या केंद्रास भेट देऊन परीक्षा व्यवस्थेची पाहणी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केली. ते या केंद्रावर पेपर संपेपर्यंत उपस्थित होते. त्यांच्यासमवेत उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी हे देखील उपस्थित होते.

नायगाव तालुक्यातील नरसी येथील राणी लक्ष्मीबाई कनिष्ठ महाविद्यालय येथे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड यांनी भेट दिली असता एक परीक्षार्थी गैरप्रकार करताना आढळून आला. संबंधित विद्यार्थ्यावर मंडळाच्या नियमानुसार कारवाई करण्यात आली. नायबतहसीलदार श्रीमती अरुणा सूर्यवंशी यांनी माहूर येथील जगदंबा उच्च माध्यमिक विद्यालय येथे भेट दिली. यावेळी एका विद्यार्थ्यावर गैरप्रकार प्रकरणी कारवाई करण्यात आली. तसेच किनवट येथील दहेलीतांडा या परीक्षा केंद्राच्या बाहेर काही अज्ञात व्यक्ती आढळून आल्याने त्या ठिकाणी संबंधित व्यक्तींविरोधात सिंदखेड पोलीस स्टेशन येथे गुन्ह्याची नोंद करण्याची कार्यवाही सुरु आहे, अशी माहिती दहेलीतांडा परीक्षा केंद्राचे संचालक यांनी दिली.

बुधवार, दि. २५ फेब्रुवारी रोजी जीवशास्त्राच्या पेपरसाठी जिल्हास्तरावरील सुमारे ६२ अधिकारी हे ६२ केंद्रांवर पूर्णवेळ उपस्थित होते. शिक्षण विभागाचे ७ अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व गटविकास अधिकारी अशा एकूण ४० व इतर अधिकाऱ्यांनी भरारी पथकांमार्फत १०९ केंद्रांवर देखरेख ठेवली. दहावी-बारावीच्या सर्व परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात होत असून, विद्यार्थी व पालकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. उर्वरित परीक्षा देखील अशाच पारदर्शक, शिस्तबद्ध वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

## तरुणीच्या आत्महत्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– फोटो समाज माध्यमावर व्हायरल करण्याची धमकी दिल्याने बदनामीच्या भीतीने एका तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना नांदेड येथे घडली. याप्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात पाच जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंधबोरी ता. किनवट येथील साईनाथ धोंडीबा पवार यांची मुलगी नांदेड शहरातील पंढरपूरनगर भागात भाड्याने राहत होती. दीपक विष्णु साळुंके, पवन शंकर साळुंके, करण शंकर साळुंके, विष्णू उत्तम साळुंके, शंकर उत्तम साळुंके सर्व रा. गोकुंदा ता. किनवट यांनी संगनमत करुन साईनाथ पवार यांच्या मुलीला सतत धमक्या देत होते. मयतासोबत असलेले फोटो समाज माध्यमावर व्हायरल करण्याची त्यांनी धमकी दिली होती. बदनामीच्या भीतीपोटी साईनाथ पवार यांच्या मुलीने दि. २३ फेब्रुवारी रोजी रात्री भाड्याने राहत असलेल्या घराच्या स्लॅबच्या हुकास ओढणीने गळफास घेवून आत्महत्या केली. मुलीचे वडील साईनाथ पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भाग्यनगर पोलीस ठाण्यात दीपक विष्णू साळुंके, पवन शंकर साळुंके, करण शंकर साळुंके, विष्णू उत्तम साळुंके, शंकर उत्तम साळुंके यांच्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कोंडिबा केजगीर करत आहेत.




## अल्पवयीन मुलावर लैंगिक अत्याचार करणाऱ्यास २० वर्षांची शिक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)**– मुदखेड तालुक्यातील एका गावात अल्पवयीन मुलाला उचलून नेऊन त्याच्यावर अनैसर्गिक अत्याचार करणाऱ्या आरोपीविरुद्ध न्यायालयाने वीस वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे.

बारड पोलीस ठाण्याच्या हद्दीत दि. ५ एप्रिल २०२१ रोजी फिर्यादीने तक्रार दिली की, आरोपी अश्वजित अनिल आठवले रा. ता. मुदखेड याने पीडित अल्पवयीन फिर्यादीवर लैंगिक अत्याचार केले. तक्रारीवरून पोस्टे बारड येथे गु.र.नं. ३२/२०२१ कलम ३७७,५०६ भादवीसह कलम ४.८ पोक्सोप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास सपोनि तुगावे यांनी करून भक्कम पुरावे गोळा करून न्यायालयात आरोपी विरूध्द दोषारोप सादर केले. सदर प्रकरणात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नरेंद्र ब्रह्मे यांनी सरकार पक्षाच्यावतीने पुरावे ग्राह्य धरून आरोपी अश्वजित अनिल आठवले यास कलम ३७७, ५०६ भादवीसह कलम ४, ८ पोक्सो अंतर्गत २० वर्षे सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.


पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी मिशन निर्भया अंतर्गत महिला व बाल सुरक्षा या संबंधित गुन्ह्यामध्ये आरोपींना तात्काळ अटक केली. तसेच भक्कम पुरावे गोळा करून न्यायालयात लवकरात लवकर दोषारोपपत्र दाखल करणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी यांना आदेशीत केले होते. महिला व बाल सुरक्षा या संबंधाने न्यायालयात चालू असलेल्या खटल्यांमध्ये विशेष लक्ष देणे बाबत सुचित केले आहे.














**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com